www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार




मुख्य संपादक - भारती आमले   उपसंपादक - श्री विलास गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे   निवासी संपादक- श्री राकेश पाटील   सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3   अंक : 10 बुधवार दि. 17 सप्टेंबर २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : 6   RNI MAHMAR/2023/89514

## लोकनेते रामशेठ ठाकूर मोखाडा महाविद्यालयाला मुंबई विद्यापीठाचा 'सर्वोत्कृष्ट कॉलेज पुरस्कार' प्रदान

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

मुंबई विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी दिला जाणाऱ्या 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार'ने रयत शिक्षण संस्थेच्या मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाला प्रदान करून केंद्रीय संसदीय कामकाज व अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. विद्यापीठाने महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्ता, संशोधनातील योगदान, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेले उपक्रम, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील उल्लेखनीय सहभागाची दखल घेत हा सन्मान दिला. या पुरस्कारामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयाने विद्यापीठ क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण केले असून विद्यार्थ्यांच्या आणि समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रेरणादायी ठरले आहे. मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमधील ग्रीन टेक्नॉलॉजी ऑडिटोरियम येथे झालेल्या या सोहळ्यास विशेष अतिथी म्हणून अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाचे सचिव चंद्रशेखर कुमार, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी, प्र कुलगुरू डॉ. अजय भामरे, कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे आदी उपस्थित होते. विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन कार्य, सामाजिक उपक्रम, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची दखल घेत हा सन्मान देण्यात आला.'रयत'चे सचिव विकास देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण चांदोरे, उपप्राचार्य डॉ. संतोष मेंगाळ, माजी प्राचार्य डॉ. लक्ष्मण भोर आदींनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी हजर होते. महाविद्यालयातील




अध्यापनाची गुणवत्ता, संशोधनातील उत्कृष्टता, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील सहभाग तसेच सामाजिक जबाबदारीची जाण यांचा महत्त्वपूर्ण वाटा असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने पुरस्कार देण्यामागे नमूद केले. अशा प्रकारे लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयाने विद्यापीठ क्षेत्रात आपले नाव अग्रस्थानी ठेवले. याबद्दल संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, मॅनेजिंग कौन्सिल ज्येष्ठ सदस्य तथा थोर देणगीदार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सचिव विकास देशमुख, सहसचिव डॉ. शिवलिंग मेनकुदळे, महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य, ग्रामस्थ यांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले.मोखाडा परिसरातील ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचे कार्य करत असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालय या सन्मानामुळे संपूर्ण विद्यापीठ परिसरातच नव्हे तर समाजजीवनातही प्रेरणादायी ठरले आहे.

# लोकल ट्रेनच्या तिकीटाच्या दरातच एसी लोकलचं तिकीट मिळणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मोठी घोषणा

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत लोकल ट्रेनने प्रवास करणाऱ्यांसाठी एक मोठी बातमी आहे. आता दिल्ली मेट्रोप्रमाणेच मुंबई लोकल ट्रेनचे दरवाजेही बंद होणार आहेत. अलिकडच्या काळात झालेल्या अपघातांना पाहता रेल्वे बोर्डाने हा मोठा निर्णय घेतला आहे. या नव्या एसी लोकलच्या तिकीटाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा केली आहे. लवकरच मुंबईतील सर्व लोकल एसी होणार असल्याची मोठी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. एसी लोकलचं तिकट वाढणार नाही. लोकलच्या तिकीटाच्या दरातच एसी लोकलचं तिकीट मिळणार असल्याची मुख्यमंत्री म्हणालेत. काही महिन्यांपूर्वी मुंब्रा रेल्वे स्थानकादरम्यान विचित्र घटना घडली होती. गर्दीमुळे लोकलच्या दारात उभे असलेले प्रवाशी रेल्वे रुळावर पडले. यात जवळपास 5 रेल्वे प्रवाशांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेनंतर प्रवाशांच्या सुरक्षेसाठी लोकल ट्रेनचे दरवाजे बंद करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने जाहीर केला होता.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रेल्वेने चेन्नईतील कारखान्यात असे डबे बनवण्यास सुरुवात झाली आहे. आता लोकल ट्रेनमध्ये स्वयंचलित दरवाजे




असतील. ऑक्टोबरपासून ही नवीन सुविधा चाचणी तत्त्वावर सुरू केली जाईल आणि वर्षाच्या अखेरीस ही ट्रेन मुंबईच्या रुळांवर धावण्यास सुरुवात करेल.

**दरवाज्यांची व्यवस्था कशी काम करेल?**

रेल्वे स्थानकावर थांबताच दरवाजे उघडतील. प्रवाशांना चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी निश्चित वेळ मिळेल. दरवाजे बंद झाल्यानंतरच ट्रेन धावेल. सुरुवातीला प्रत्येक लोकल ट्रेनमध्ये असे 2 डबे बसवले जातील. रेल्वेने 2023 मध्येही अशी चाचणी घेतली होती पण तांत्रिक अडचणींमुळे ती यशस्वी झाली नाही. यावेळी जुन्या चुका दुरुस्त करून नवीन प्रणाली तयार करण्यात आली आहे. ही प्रणाली लागू केल्याने प्रवास अधिक सुरक्षित होईल. गर्दीदरम्यान पडण्याची किंवा अपघात होण्याची शक्यता कमी होईल आणि तुम्हाला मेट्रोसारखा अनुभव मिळेल.

**1. मुंबई लोकल ट्रेनमध्ये स्वयंचलित दरवाजे का लागू केले जात आहेत?**

मुंबई लोकल ट्रेनमधील अपघात, विशेषतः गर्दीमुळे प्रवाशांचे रुळावर पडणे यासारख्या घटनांमुळे रेल्वे बोर्डाने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी स्वयंचलित दरवाजे लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे प्रवास अधिक सुरक्षित होईल आणि अपघातांची शक्यता कमी होईल.

**2. स्वयंचलित दरवाजे कशी काम करतील?**

रेल्वे स्थानकावर ट्रेन थांबताच दरवाजे स्वयंचलितपणे उघडतील. प्रवाशांना चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी निश्चित वेळ मिळेल. दरवाजे बंद झाल्यानंतरच ट्रेन पुढे जाईल. यामुळे मेट्रोसारखा सुरक्षित आणि व्यवस्थित प्रवास अनुभव मिळेल.

**3. ही सुविधा कधीपासून सुरू होणार आहे?**

ऑक्टोबर 2025 पासून ही सुविधा चाचणी तत्त्वावर सुरू होईल आणि वर्षअखेरीस (2025) ही ट्रेन मुंबईच्या रुळांवर धावण्यास सुरुवात करेल.

## नैताळेच्या मनीषा खटाटे यांचा बनारस लिटररी फेस्टिव्हल मुंबईत गौरव

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

:- राष्ट्रीय हिंदी दिनानिमित्त आयोजित "मुंबई में बनारस" या साहित्य आणि कला महोत्सवात नैताळे येथील मूळ रहिवाशी हिंदी लेखिका मनीषा खटाटे यांचा सन्मान करण्यात आला. महाराष्ट्राचे माहिती आणि संस्कृती मंत्री मा.आशिष शेलार यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

या महोत्सवात प्रसिद्ध हिंदी लेखिका डॉ. राही मासूम रझा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या साहित्यावर चर्चासत्राचे आयोजनही करण्यात आले होते. आसिफ आझमी, विभूती नारायण, डॉ. रवींद्र कात्यायन जी, मनीषा खटाटे यांनी या चर्चेत भाग घेतला. राहींच्या साहित्यातील वास्तववादावर मनीषा खटाटे यांनी आपले विचार व्यक्त केले आणि सांगितले की, वर्तमान काळातही राहींचे साहित्यिक कृति महत्त्वाच्या असून मानवीय चेतना-संवेदना हा राहींच्या साहित्याचा आधार आहे, केवळ साहित्यच माणसाची नैतिक जाणीव जागृत करून मानवतेला प्रेरणा देऊ शकते.

बनारस साहित्य महोत्सवाचे सचिव माननीय ब्रजेश सिंह राव आणि प्रसिद्ध चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक रवी यादव यांनी कार्यक्रमाच्या यशात महत्त्वाची भूमिका बजावली. हा भव्य कार्यक्रम मुंबई विद्यापीठातील बनारस साहित्य महोत्सव आणि नवभारत निर्माण समितीने आयोजित केला होता.



# बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी संपूर्ण आंबेडकरी बौद्ध समाजाची एकजूट मैदानात उतरणार.

## येत्या 14 ऑक्टोबर रोजी मुंबईत राणीबाग ते आझाद मैदान विराट रॅलीचे आयोजन केंद्रीयराज्यमंत्री रामदास आठवल

**वाशिम :-** बुद्धगया येथील महाबोधी महाविहार हे बौद्धांचे सर्वोच्च जागतिक श्रद्धास्थान आहे. महाकारुणिक तथागत भगवान बुद्धांना जिथे ज्ञानप्राप्ती झाली ते बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बौद्धांच्या पूर्णपणे ताब्यात नाही. ज्या कर्मकांड पिंडदानाला अंधश्रद्धेला भगवान बुद्धांनी विरोध केला ते प्रकार महाबोधी महाविहार परिसरात होत असल्याने जगभरातील बौद्धांच्या भावना दुखावल्या जात आहेत.महाबोधी महाविहार व्यवस्थापन ट्रस्ट मध्ये चार हिंदू चार बौद्ध आणि एक कलेक्टर असे सदस्य असतात..कलेक्टर जर हिंदू असेल तर ते चेअरमन असतात. महाबोधी महाविहार पूर्णतः बौद्धांच्या ताब्यात नाही.त्यामुळे महाबोधी महाविहार व्यवस्थापन कायदा 1949 ज्याला बिटी ॲक्ट म्हटले जाते तो बी टी ॲक्ट रद्द झाला पाहिजे. भारताचे संविधान 26 जानेवारी 1950 रोजी लागू झाले असून त्यापूर्वीचा 1949 चा बिहार विधानसभेचा बिटी ॲक्ट रद्द झाला पाहिजे.महाबोधी महाविहार ट्रस्ट मधील सर्व 9 सदस्य आणि चेअरमन हे बौद्ध असले पाहिजेत.प्रत्येक धर्माचे




धार्मिकस्थळ त्या त्या धर्माच्या ट्रस्ट कडे असतात.हिंदू मंदिरात हिंदू ट्रस्टी; मुस्लिमांच्या दर्गा - मशीद मध्ये मुस्लिम ट्रस्टी; शिखांच्या गुरुद्वारात शीख ट्रस्टी मग बौद्धांचे बुद्धविहार बौद्धांच्या ताब्यात का नाही? बौद्धांच्या बुद्धविहार ट्रस्ट मध्ये बौद्ध ट्रस्टी का नको? महाबोधी महाविहार बौद्धांचे असून त्याचे व्यवस्थापन पूर्णपणे बौद्धांचे असले पाहिजे.महाबोधी महाविहार इतरांच्या ताब्यातून मुक्त करून बौद्धांच्या ताब्यात द्यावे.या मागणीसाठी महाराष्ट्रातील सर्व रिपब्लिकन गट सर्व बौद्ध आंबेडकरी संघटना; सर्व पक्षीय बौद्ध नेते एकत्र आले असुन येत्या 14 ऑक्टोबर 2025 रोजी दुपारी 12 वाजता महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे या मागणीसाठी भायखळा राणीबाग ते आझाद मैदान अशी मुंबईत शांततापूर्ण विराट रॅली आयोजित करण्यात आली आहे. या रॅलीत प्रचंड संख्येने सर्व बौद्ध आंबेडकरी जनतेने ताकदीने सहभागी व्हावे असे आवाहन महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या एकजुटीचे निमंत्रक रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले.या पत्रकार परिषदेस महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी एकत्रित आलेले विविध पक्षांचे अनेक बौद्ध नेते ; विविध रिपब्लिकन गटांचे नेते उपस्थित होते. मुंबईत गरवारे क्लब येथे महाबोधी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी मुंबईत आयोजित करण्यात येणाऱ्या विराट रॅली चे नियोजन करण्यासाठी सर्व रिपब्लिकन गटांची सर्व बौद्ध आंबेडकरी संघटनांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीत महाबोधी महाविहार मुक्ती साठी मुंबईत सर्व बौद्धांच्या एकजुटीची रॅली 14 ऑक्टोबर ला भायखळा राणी बाग ते आझाद मैदान अशी आयोजित करण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. यावेळी बैठकीचे निमंत्रक ना.रामदास आठवले; प्रा.जोगेंद्र कवाडे; डॉ राजेंद्र गवई; नाना इंदिसे; खासदार चंद्रकांत हंडोरे; खासदार वर्षाताई गायकवाड; अर्जुन डांगळे; अक्षय आंबेडकर; राजू वाघमारे; जयदेव गायकवाड; अविनाश महातेकर; राम पंडागळे;भाई गिरकर ; दैनिक सम्राट चे संपादक कुणाल बबन कांबळे; तानसेन ननावरे; काकासाहेब खंबाळकर; सागर संसारे; दिलीप जगताप; सुनील निर्भवने; सुरेश केदारे; नितीन मोरे; मिलिंद सुर्वे; विलास रूपवते ; रवी गरुड; महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचे निमंत्रक आकाश लामा; पूज्य भदंत राहुल बोधी महाथेरो; भदंत विरत्न थेरो; भदंत आयुपाल; भदंत शांतिरत्न; भदंत लामा; आदी अनेक मान्यवर सर्व बौद्ध संघटना आणि रिपब्लिकन गटांचे नेते उपस्थित होते.महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी 14 ऑक्टोबर ही तारीख सर्वानुमते ठरवण्यात आली आहे. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी बौद्ध धम्माची धम्मदीक्षा घेऊन या देशात धम्मचक्र प्रवर्तित केले.त्यामुळे 14 ऑक्टोबर ही तारीख धम्मासाठी योगदान देण्याची तारीख असून येत्या 14 ऑक्टोबर रोजी महाबोधी महाविहार मुक्ती साठी भायखळा राणीबाग ते आझाद मैदान अशी शांततापूर्ण विराट रॅली आयोजित करण्यात आली आहे.एक दिवस धम्मासाठी देऊया आणि महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी यंदा 14 ऑक्टोबर मुंबईत जाऊया असा निर्धार करून मुंबई ठाणे रायगड नाशिक पालघर सह राज्यभरातील बौद्ध आंबेडकरी जनतेने या रॅलीत सहभागी व्हावे असे आवाहन महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन आणि सर्व आंबेडकरी बौद्ध नेत्यांनी केले आहे.

महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या रॅलीला अड.प्रकाश आंबेडकर; भीमराव आंबेडकर; आनंदराज आंबेडकर यांनाही निमंत्रित करण्यात आले आहे असे संयोजकांनी सांगितले.




## सततच्या पावसाने हलक्या धानाची नासाडी ; नुकसान भरपाई द्यावे ; हिरालाल नागपूरे.

**सिहोरा :-** सततच्या पावसाने हलक्या धानाची नासाडी झालेली आहे.आजच्या घडीला शेतकरी संकटात सापडलेला आहे. तुमसर तालुक्यातील शेतकऱ्यांना शासनाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी पंचायत समिती तुमसरचे माजी उप सभापती हिरालाल नागपुरे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केली आहे. सततच्या नापिकीमुळे आधीच शेतकरी कर्ज बाजारी झाला आहे. जंगली प्राण्यांनी आपला मोर्चा थेट गावाकडे वळविला आहे.शेतकऱ्यात रानटी डुकरांची चांगलीच भीती संचारली आहे.शेतकऱ्यावर केव्हा हमला होईल सांगणे कठीण झाले आहे.जंगली प्राण्यांच्या वाढत्या प्रकोपामुळे तुमसर, सिहोरा व बपेरा परिसरातील शेतकरी चांगलेच धास्तावले आहेत.या जंगली प्राण्यांनी सुद्धा धान पिकावर आपला हल्ला चढविला आहे.



निसर्गाचा लहरीपणा व वाढत्या महागाईमुळे आधीच शेतकरी दारिद्री नारायणाचा अवतार म्हणून जगत आहे. सततच्या पावसाने हलक्या धानाची माती होऊन जमिनीत लोडला आहे. पावसाची अशीच स्थिती असली तर भारी धानाला सुद्धा धोका आहे.सततच्या पावसाने गादमासी, खोडकिडा, मावा, तुडतुडा व पाणे गुंडाळणाऱ्या अळीचा सुद्धा प्रकोप दिवसें दिवस वाढत चालला आहे.

काही शेतकऱ्यांची धानाचे पीक मागील पुरात वाहून गेले आहे. तो शेतकरी सुद्धा संकटात सापडलेला आहे. औषधी व खताच्या वाढत्या किमती आणी नागरटी व मजुरांचा खर्च याची जुळवा जुळवी केल्यास शेतकऱ्यांची स्थिती फारच बिकट झाली आहे. सततच्या पावसाने शेतकऱ्यांना चांगलेच झोडपले आहे.या सर्व बाबींचा विचार करून शासनाने तुमसर तालुक्यातील शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी पंचायत समिती तुमसरचे माजी उपसभापती हिरालाल नागपूरे यांनी केली आहे.

# कोप्रोली सुहास मित्र मंडळाचा 26 वा गणेशोत्सव - नवसाला पावणारा राजा भक्तांच्या सेवेत.

## "लालबागच्या राजाची प्रतिकृती धार्मिक-सामाजिक आणि नवसाला पावणारा राजा विशेष आकर्षण"

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी उरण रायगड रणिता ठाकूर**

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील कोप्रोली गावातील सुहास मित्र मंडळ, कोप्रोली मागील २५ वर्षांपासून कार्यरत आहे.यंदा मंडळाचे २६ वे वर्ष पूर्ण होत असून, २००० साली युवकांच्या प्रेरणेने आणि भक्तीभावनेतून या मंडळाची स्थापना करण्यात आली होती.या वर्षीच्या उत्सवाचे वैशिष्ट्य असे की, गणेशाची आकर्षक लालबागच्या राजाची प्रतिकृती उभारण्यात आली असून, दैनंदिन पूजा-आरतीच्या माध्यमातून संस्कृती जपण्याचा प्रयत्न केला जात आहे. लोहार गल्लीतील सुहास मित्र मंडळाच्या गणेश मंडपात दरवर्षीप्रमाणेच सांस्कृतिक व धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात भजन, कीर्तन, सांस्कृतिक नृत्य तसेच विविध स्पर्धा घेण्यात आल्या. विशेष करून पंचक्रोशीतील कलाकारांना मंडपात आपली कला सादर करण्यास प्रोत्साहन दिले जाते.मंडळामार्फत विविध सामाजिक उपक्रमही राबवले गेले असून, रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, स्वच्छता मोहीम आणि वृक्षारोपण या उपक्रमांमध्ये सर्व सदस्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.मंडळातील युवकवर्ग सजावट, शिस्त आणि उपक्रमांच्या यशस्वी आयोजनात पुढाकार घेताना दिसतो. महिला वर्गदेखील आरती, भजन, कीर्तन, स्वच्छता व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवतो. प्रत्येक कार्यक्रमात शिस्तीचे पालन व निर्दोष आयोजन होईल, याकडे मंडळाचे विशेष लक्ष असते.

नवसाला पावणाऱ्या सुहास मित्र मंडळ, कोप्रोलीच्या गणरायाला पंचक्रोशीतील नागरिक व हितचिंतक भेट देऊन, देणगी देऊन सहकार्य करत असतात. नवसाला पावणारा राजा म्हणून प्रसिद्ध असलेल्या या गणरायाच्या चरणी भक्त आपली गाऱ्हाणी मांडतात व त्यांची पूर्तता होत असल्याने भक्तांचा विश्वास अधिक दृढ होत आहे. नवस फेडण्यासाठी येथे मोठी गर्दी होत असते.मंडळातील विसर्जन सोहळा हा देखील विशेष आकर्षणाचा भाग आहे. या सोहळ्यात संपूर्ण गावातील गणेशभक्त सहभागी होऊन, शिस्तीने व उत्साहाने मिरवणूक काढली जाते. कोणतेही गालबोट न लागता विसर्जन सोहळा संपन्न होतो.दरवर्षी गणरायाचे आगमन साखर चौथीच्या दिवशी केले जाते. यावर्षी गणेशाची प्राणप्रतिष्ठा १० सप्टेंबर २०२५ रोजी करण्यात आली. तसेच विसर्जन मिरवणूक गुरुवार दिनांक १८ सप्टेंबर २०२५ रोजी होणार आहे. यावर्षी मंडळाचे अध्यक्ष जीवन म्हात्रे आणि उपाध्यक्ष प्रितेश म्हात्रे, मंडळातील संपूर्ण युवकवर्ग एकजुटीने कार्यरत आहे.उत्सावादरम्यान महिला व लहान मुलांसाठी विशेष खेळ आयोजन, कला क्रीडा शैक्षणिक क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी गुणगौरव सोहळा, तसेच विविध लोककला आणि लोकनृत्य सादरीकरण होते. सुहास मित्र मंडळाच्या भावी योजनांमध्ये अधिकाधिक समाजोपयोगी कार्य व्यापक स्वरूपात राबवण्याची वचनबद्धता आहे. एकूणच, पंचक्रोशीत या नवसाला पावणाऱ्या राजाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत असून, गणरायाचे आशीर्वाद घेण्यासाठी भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसत आहे.






# कोराडी नागपूर परिसरात पर्यावरण पर्यटन प्रकल्प राबविण्यासाठीमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत महाजनको व एनएमआरडीएमध्ये सामंजस्य करार



**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर**

**मुंबई, दि. 16** - नागपूर महानगर क्षेत्रातील कोराडी (ता.कामठी) या ठिकाणी पर्यावरणीय पर्यटन स्थळ (ईकोटुरिझम) विकसित करण्यासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एनएमआरडीए) आणि महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड (महाजनको) यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार पर्यटनस्थळ विकसित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड या कंपनीची 232.64 हे. आर. जागा नागपूर प्रदेश विकास प्राधिकरणाला 30 वर्षाच्या भाडे करारावर प्रतिवर्ष 1/- रूपये भाडेपट्टयावर हस्तांतरीत करण्यात येणार आहे.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्य सचिव राजेशकुमार, अपर मुख्य सचिव (नवि-१) असिमकुमार गुप्ता, उर्जा विभागाचे अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, महाजेनकोचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी, नामप्रविप्राचे महानगर आयुक्त संजय मीणा आदी उपस्थित होते.

महाजेनको कंपनीने भाडे कराराने दिलेली जागा मौजा कोराडी, मौजा महादुला, मौजा खापरखेड़ा, मौजा नांदा (तालुका कामठी) आणि मौजा घोगली ता. नागपूर (ग्रामीण) या भागात व्यापलेली आहे. ही जमिन नैसर्गिक संसाधनांच्या सान्निध्यात असून, जागतिक दर्जाचे पर्यावरणीय पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी उपयुक्त आहे. या उपक्रमाचा मुख्य आधार शाश्वत जलकेंद्रित क्रियाकलपांवर आहे. नॉन-मोटरायइड बोटिंग (पॅडल बोट्स, कायाक्स, कॅनू), पर्यावरणपूरक शिकारा आणि फ्लोटिंग डेक राइड्स, फ्लोटिंग प्लॅटफॉर्मवरून पक्ष्यांचे निरीक्षण, निसग पर्यटन हे उपक्रम या ठिकाणी राबविण्यात येणार आहेत.

प्राधिकरणाला दिलेली जमिन ही जमीन नागपूरच्या महत्त्वाच्या शहरी आणि नैसर्गिक संसाधनांच्या जवळ असल्यामुळे, जागतिक दर्जाचे पर्यावरण पर्यटन स्थळ म्हणून तिचा विकास केला जाणार आहे. हा उपक्रम पर्यटन उद्योगास चालना देईल, स्थानिक लोकांना रोजगाराच्या नविन संधी देईल व परिसराचा सामाजिक-आर्थिक विकास सशक्त करेल, सदर प्रकल्प उभारणीत पर्यावरण संरक्षणाच्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्यात येईल, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

*सामंजस्य कराराचे तपशील*

कराराची मुदतः सुरुवातीला 30 वर्षे, वार्षिक केवळ 1 रुपये भाडे, व त्यानंतर वाढीव मुदतीचा पर्याय उपलब्ध

महाजेनकोचे अधिकारः सध्याच्या थर्मल पॉवर स्टेशन आणि सांडपाणी प्रक्रिया केंद्र यांच्यावर पूर्ण मालकी व नियंत्रण कायम राहणार.

प्राधिकरणाचे अधिकारः तलावाच्या जलपृष्ठभागाचा वापर फक्त पर्यावरण पर्यटन प्रकल्पासाठी करण्याचे विशेष हक्क एनएमआरडीएला दिले जातील.

महाजेनकोच्या संचालक मंडळाने या प्रस्तावास मान्यता दिली आहे.

# जे.एस.एस रायगड च्या माध्यमातून दोन दिवसीय 'पत्रकारिता प्रमाणपत्र कार्यशाळा'उत्साहात संपन्न.

## सकारात्मक समाज प्रेरणा जागृतीत जे.एस.एस रायगडचे भरीव योगदान - डॉ.मेघा सोमैया.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधि प्रमुख/एम.डी.भोईर**

अलिबाग येथे भारत सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाची योजना जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या माध्यमातून आणि ज्येष्ठ पत्रकार तथा आवाज महामुंबई चे संपादक मिलिंद खारपाटील यांच्या विशेष पुढाकारातून दोन दिवसीय *"पत्रकारिता प्रमाणपत्र कार्यशाळेचे"* आयोजन "जे. एस. एस. रायगड" पर्यावरण पूरक व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सहाण-अलिबाग या ठिकाणी दिनांक १३ व १४ सप्टेंबर २०२५ रोजी करण्यात आले ह्या दोन दिवशीय कार्यशाळेचे उद्घाटन दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी संपन्न झाले. उद्घाटन समारंभ प्रसंगी शहरी व ग्रामीण भागातील गरजू व दिव्यांग लाभार्थ्यांनी मध्ये जन शिक्षण संस्थान रायगड च्या माध्यमातून सकारात्मक प्रेरणा जागृतीत भरीव योगदान दिले असल्याचे मत मुलाखती प्रसंगी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा *डॉ मेधा सोमैया* यांनी व्यक्त केले तर समाजाचा सकारात्मक आरसा म्हणून पत्रकारिता हे कौशल्य अतिशय प्रभावी असल्याचे मत विद्यमान अध्यक्ष *डॉ नितीन गांधी* यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले. पत्रकारिता कार्यशाळेच्या माध्यमातून एक सक्षम पत्रकार व दर्जेदार पत्रकारिता निर्मिती हेच कार्यशाळेचे मुख्य ध्येय असल्याचे मत संचालक *डॉ विजय कोकणे* यांनी व्यक्त केले.



संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष *डॉ. नितीन गांधी*, उपाध्यक्षा *सौ. रत्नप्रभा बेल्हेकर*, *श्री नरेनभाई जाधव* संचालक डॉ. विजय कोकणे व व्यवस्थापन मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली व "कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार" यांच्या विशेष पुढाकारातून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षणाचे कार्य मागील २० वर्ष पासून सक्रिय पणे सुरु आहे व संस्थेने आजपर्यंत ७० हजाराहून अधिक प्रशिक्षणार्थी यशस्वीरित्या प्रशिक्षित केलेले आहेत व अशा अनेक वेळा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त संस्थेच्या माध्यमातून भारत सरकार पुरस्कृत कार्यशाळेचे प्रमाणपत्र हे निश्चितच पत्रकारांना पाठबळ देईल व म्हणूनच आम्ही कार्यशाळेच्या आयोजन नियोजनाकरिता पुढाकार घेतला असल्याचे मत पत्रकार श्री मिलिंद खारपाटील यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले तसेच भविष्यात अनेक पत्रकार समूहाने अशा कार्यशाळेचे आयोजन निश्चितच जन शिक्षण संस्थांच्या सहकार्यातून करतील असा विश्वास देखील त्यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केला. सदर संपूर्ण कार्यशाळेच्या कार्यक्रमा प्रसंगी संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्षा सौ. रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे, धर्मराज सामाजिक प्रतिष्ठान रायगडचे संचालक श्री. सचिन चव्हाण, अकाउंट मॅनेजर सौ. प्रतिक्षा चव्हाण, वेदांत बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा सौ. आशा कोकणे, श्री. सोहम वारंगुसे, सौ. पूजा वारंगुसे, पत्रकार मिलिंद खारपाटील यांच्या समवेत महाराष्ट्रातील विविध विभागातून आलेल्या १२ पत्रकारानी कार्यशाळेत हीरहिरीने सहभाग नोंदवला कार्यक्रमाचा समारोप सदर संस्था प्रतिनिधींच्या हस्ते १४ सप्टेंबर २०२५ रोजी सहभागी पत्रकार बंधू भगिनींना प्रमाणपत्र देऊन करण्यात आला.

# जाफराबाद येथे कॅम्पस भरतीचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**टेंभुर्णी प्रतिनिधी अनिल ससाने**

जालना जिल्ह्यातील जाफराबाद येथे दिनांक १८ सप्टेंबर २०२५ रोजी ठीक सकाळी ११:०० वाजता सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जाफराबाद या ठिकाणी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व समुपदेशन केंद्रामार्फत कॅम्पस भरतीचे आयोजन करण्यात आले आहे.




या कॅम्पस भरतीसाठी बजाज ऑटो लिमिटेड वाळूज छत्रपती संभाजी नगर व टाटा मोटर्स लिमिटेड पुणे या कंपन्या येत असून या कॅम्पस भरतीसाठी विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता किमान १२ वी कला, वाणिज्य, विज्ञान व आयटीआय अशी आहे.

या कॅम्पस मध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रतिमहा १६८८० विद्या वेतन, निवास व्यवस्था व भोजन मिळणार आहे.

या भरतीसाठी जाफराबाद परिसरातील विद्यार्थ्यांसाठी अतिशय मोठी सुवर्णसंधी आहे, म्हणून महाविद्यालयातील व जाफराबाद तालुक्यातील विद्यार्थ्यांनी या भरतीसाठी उपस्थित राहावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. आर. टी. देशमुख व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व समुपदेशन केंद्राचे समन्वयक प्रोफेसर डॉ. विजय पाटील व सर्व समिती सदस्यांनी केले आहे.

विद्यार्थ्यांनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा आणि आपलं करिअर उज्वल करावे याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

# नांदेड येथील हैदराबाद गॅजेटनुसार बंजारा समाजाला एसटी प्रवर्गात समाविष्ट करण्यात यावे या मागणीसाठी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयसमोर आमरण उपोषण

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड येथे उपोषणास बसलेल्या बंजारा बांधव अँड प्रदीप राठोड व पप्पू चव्हाण यांची सकाळी 11.10 वाजता उपोषण स्थळी मुखेड कंधार मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार डॉ तुषार राठोड साहेब यांनी दिली भेट

यावेळी आ.डॉ.तुषार राठोड साहेब यांनी अड प्रदीप पवार व पप्पू चव्हाण यांच्याशी चर्चा केली. यावेळी बंजारा बांधव यांनी आपल्यासोबत आम्ही आहोत आपल्या निर्णयाशी आम्ही सहमत तुम्हीच आमचे प्रश्न सोडवू शकता आपण पालकमंत्री यांना सोबत घेऊन यावे अशी विनंती केली असता लागलीच आ.डॉ.तुषार राठोड साहेब यानी नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा मंत्री महोदय मा.ना.श्री.अतुलजी सावे साहेब यांना भ्रमणध्वनी द्वारे संपर्क साधून त्यांच्या समस्या सांगितल्या व पालकमंत्री महोदय असे म्हणाले की मी उद्या सकाळी जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे येणार आहे.




आपण माझ्यासोबत राहा आणि आपण ध्वजारोहण झाल्यानंतर उपोषण स्थळी जाऊन आपण त्यांच्या मागण्या समजून शासन दरबारी त्याचे प्रश्न मांडून सोडवण्याचा प्रयत्न करू आणि त्या बंजारा बांधवाचे उपोषण सोडूया असे पालकमंत्री आ.डॉ.तुषार राठोड साहेब यांना बोलताना सांगितले

आ.डॉ.तुषार राठोड साहेब यांनी बंजारा बांधव अड प्रदीप पवार व पप्पू चव्हाण यांच्याशी चर्चा केली व त्यांनी आपण सोबत रहा आम्ही तुमचे म्हणण्यानुसार आम्ही उपोषण मागे घेऊ असे आश्वासन दिले.

यावेळी उपस्थित देविदास भाऊ राठोड बंजारा क्रांती दल अध्यक्ष, डॉ.बी.डी. चव्हाण, नवीन राठोड, मुन्ना पवार, लक्ष्मण जाधव, मी सुधीर चव्हाण, बंडेश महाराज, उत्तम चव्हाण, राजू राठोड, विजय चव्हाण, सचिन पवार, सचिन चव्हान, विलास चव्हाण, आदी बंजारा बांधव उपस्थित होते

# निफाड पूर्व भागातील नापीक क्षेत्रासाठी आ. रोहित पवार मैदानात

## आपत्तीग्रस्तांसह जिल्हाधिकाऱ्यांची भेट

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**निफाड** :- निफाड तालुक्यातील पूर्व भागातील शेतकऱ्यांवर सलग पावसाचे संकट कोसळले असून मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवार दि.१५ सप्टेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते आमदार रोहितदादा पवार यांनी देवगाव गटातील शेतकरी शिष्टमंडळासह जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली.



सलग पाच महिन्यांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे शेतीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी आमदार पवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष निवृत्ती गारे यांच्यासह शिष्टमंडळानेही आपले मुद्दे मांडले. या मागणीवर जिल्हाधिकाऱ्यांनी शासन स्तरावर तातडीने अहवाल तयार करून निफाड तालुक्यातील खेडलेझुंगे, कोळगाव, कानळद, रुई, देवगाव, वाकद, शिरवाडे या गावांचा सरसकट पंचनामा करून शेतकऱ्यांसाठी कायमस्वरूपी तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. या भेटीत स्वाभिमानीचे निफाड तालुका अध्यक्ष गजानन घोटेकर, धनंजय घोटेकर, शांताराम जाधव , पप्पू घोटेकर, राहुल घोटेकर यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

कोळगाव, खेडलेझुंगे, कानळद, देवगाव, रुई, वाकद, शिरवाडे या गावांमध्ये सलग पाच महिन्यांपासून भूजल पातळी जमिनीवर आली आहे. ढगाळ वातावरण व ७५ ते ८० मि.मी पावसामुळे संपूर्ण शेती नापीक झाली असून शेतकऱ्यांचे उदरनिर्वाहाचे साधन हिरावले गेले आहे. शासनाने हेक्टरी २ लाख रुपये मदत देऊन खरीप हंगामासाठी संपूर्ण कर्जमाफी करावी.
**निवृत्ती गारे पाटील,**
**जिल्हाध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना**

**दैनिक युवक आधार**
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# श्रीवर्धनच्या नानवली-मणेरी किनारी ५९ लाखांचा चरस जप्त

## दिघी सागरी पोलिसांची धडक कारवाई; नागरिकांचा पोलिसांना दाद

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी शिरीष समेळ म्हसळा**




रायगड जिल्ह्यात अमली पदार्थांच्या अवैध वाहतुकीला आळा घालण्यासाठी पोलिस विभागाने आणखी एक मोठी कारवाई केली आहे. श्रीवर्धन तालुक्यातील नानवली-मणेरी समुद्र किनारी अवैधरित्या साठवून ठेवलेला तब्बल १९ किलो ९६६ ग्रॅम वजनाचा, सुमारे ५९ लाख ८३ हजार रुपये किमतीचा चरस दिघी सागरी पोलिसांनी जप्त केला.

सध्या सुगंधित तंबाखू, गुटखा तसेच इतर अनधिकृत व्यवसायांवर विशेष लक्ष ठेवणाऱ्या रायगड जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षक श्रीमती अचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. एन.डी.पी.एस. अधिनियम, १९८५ अंतर्गत दिघी सागरी पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ६१/२०२५ दाखल करण्यात आला आहे.

उपविभागीय पोलिस अधिकारी सौ. सविता गर्जे यांच्या देखरेखीखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक हनुमंत शिंदे यांनी पथकासह या मोहिमेचे नेतृत्व केले. मणेरी-नानवली गावच्या हद्दीत समुद्रकिनारी अज्ञात इसमाने विक्रीच्या उद्देशाने ठेवलेला अमली पदार्थ बेवारस स्थितीत आढळून आला.

या मोहिमेत हेडकॉन्स्टेबल शेखर लिंगप्पा कांबळे, संतोष नामदेव चव्हाण, यशवंत लक्ष्मण मुंडे, श्याम ओंकार गावंडे आणि कॉन्स्टेबल अजय देविदास खेडकर यांनी विशेष मेहनत घेतली.

सुमारे ३२ वर्षांपूर्वी या किनारपट्टीलगतच्या शेखाडी भागात समुद्रमार्गे शस्त्रास्त्रे आणि स्फोटके उतरविण्याचा प्रकार घडला होता. त्या घटनांची आठवण करून देत नागरिकांनी पोलिस विभागाच्या तात्काळ कारवाईचे कौतुक केले.

पोलिस विभागाच्या या हालचालीमुळे श्रीवर्धन-म्हसळा परिसरात अमली पदार्थ व इतर अनधिकृत व्यवसायाविरोधात मोठा इशारा देण्यात आल्याची प्रतिक्रिया स्थानिकांकडून व्यक्त होत आहे.

# उरण येथे राष्ट्रीय लोक आदालतीचे आयोजन.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता दिवाणी न्यायालय क स्तर उरण येथे राष्ट्रीय लोक आदलतीचे आयोजन करण्यात आले होते. लोक अदालत ही कायद्याने स्थापन केलेला एक पर्याय, विवाद निवारण यंत्रणा आहे . जिथे न्यायालयात प्रलंबित असलेले वाद किंवा निवाड्याच्या आधीचे वाद सामंजस्याने किंवा वाटाघाटीने सोडवले जातात. हे एक व्यासपीठ आहे जिथे न्यायाधीश, कायदेतज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते एकत्र येऊन प्रकरणे लवकर ,स्वस्तात आणि सौहार्दपूर्ण मार्गाने निकाली निघतात. हे न्यायालय व्यतिरिक्त वादांचे निराकरण करते. जेणेकरून लोकांना जलद आणि सोपा न्याय मिळतो.सामंजस्य पूर्ण आणि वाटाघाटीचा दृष्टिकोन येथे वापरला जातो. सहसा न्यायिक अधिकारी, निवृत्त न्यायाधीश, कायदे तज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते यांचा समावेश असतो.

माननीय पालक न्यायमूर्ती आर. आय. छागला साहेब व मा. न्यायमूर्ती साठे साहेब, मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश रायगड अलिबाग यांच्या उपस्थितीमध्ये



व्ही.सी.द्वारे लोक अदालत च्या आभासी उद्घाटन समारंभासाठी मा. एम.एस. काझी, दिवाणी न्यायाधीश क स्तर उरण व श्रीमती जी.के .आर टंडन, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर, उरण, उरण तालुका वकील संघटनेचे अध्यक्ष श्री. व्हि. एल. पाटील न्यायालयीन कर्मचारी व पक्षकार उपस्थित होते.

सदर लोक अदालती मध्ये दोन कक्ष ठेवण्यात आले होते. पहिल्या कक्षावर मा. एम. एस. काझी, दिवाणी न्यायाधीश क स्तर उरण तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती उरण व अडव्होकेट केवल गावंड पंच म्हणून कार्यरत होते .तसेच दुसऱ्या कक्षावर मा. एस.पी. वानखेडे सहदिवाणी न्यायाधीश क स्तर उरण व ॲडव्होकेट अनुराग ठाकूर कार्यरत होते. सदर लोक अदालतीकरिता ५५३४ प्रकरणे ठेवण्यात आली होती. व त्यापैकी एकूण १७२४ प्रकरणे निकाली निघाली. सदर प्रकरणांमध्ये दोन करोड,बत्तीस लाख, तेहतीस हजार ,सहाशे एक्याण्णव एवढ्या रकमेची तडजोड झाली. मोठ्या संख्येने लोकांनी हजर राहून लोक न्यायालय यशस्वीपणे पार पडले.

अशी ही लोक अदालत प्रणाली गांधीवादी तत्त्वावर आधारित आहे प्रलंबित खटले, निरक्षरता ,गरिबी, न्यायालय मध्ये उच्च रिक्त जागा इत्यादी अनेक कारणांमुळे लोक अदालत भारतात खूप महत्त्वाची भूमिका बजावते. परंतु ही लोक अदालत चळवळ तेव्हाच यशस्वी होऊ शकते जेव्हा लोक अदालतीच्या कामकाजात लोक स्वइच्छेने सहभागी होतील.

# सुरगाणा महाविद्यालयात जागतिक ओझोन दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात भूगोल विभागांतर्गत दिनांक १६ सप्टेंबर जागतिक ओझोन दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते व महाविद्यालयाचे उप प्राचार्य प्रा. व्ही. डी. अहिरे यांनी विद्यार्थ्यांना ओझोन थराचे महत्त्व पटवून सांगितले. ओझोन थराचा पृथ्वीवरील जीवनाच्या सुरक्षेसाठी असलेला थर म्हणून उल्लेख केला. पर्यावरण प्रदूषण, रसायनांचा अतिरेकी वापर, औद्योगिकीकरण आणि हवामान बदलामुळे ओझोन थरावर होणारे दुष्परिणाम स्पष्ट केले. तसेच "ओझोन वाचवा – भविष्य वाचवा" हा संदेश देत झाडे लावा, प्लास्टिकचा कमी वापर करा, पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारा




यावर त्यांनी भर दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. एस. एम. भोये यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना जागरूक नागरिक म्हणून जबाबदारी पार पाडण्याचे आवाहन केले. त्यांनी शाश्वत विकास, पर्यावरण संवर्धन आणि भावी पिढ्यांसाठी स्वच्छ हवा ठेवणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. देवचंद कव्हर यांनी केले. तर आभार प्रा.देवीदास साळुंखे यांनी मानले कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. सी. आर. पाटील, प्रा. महाले , प्रा. भगरे तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्र, मुंबई व विदर्भ संघ सज्ज"

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशन व मधुरा टेनिस क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सातवी १७ वर्षाखालील राष्ट्रीय टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा मधुरा (उत्तर प्रदेश) येथे सुरू होत आहे. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत महाराष्ट्र, मुंबई आणि विदर्भ या तिन्ही संघांचा सहभाग असून महाराष्ट्रातील सर्व खेळाडूंची तयारी पूर्ण झाली आहे.

महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव मीनाक्षी गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली हे तिन्ही संघ स्पर्धेत उतरणार आहेत.

**महाराष्ट्र संघ** :कर्णधार हर्षद डवले, धीरज ठाकरे, विघ्नेश मढवी, सिद्धेश पारखे, अजित विश्वकर्मा, संगम राजभर, संदेश इंगळे, प्रेम कदम, आयुष खरात, सिद्धेश गोलांबडे व गैरिज माळी.

**मुंबई संघ** :



सुबोध मायनाक, आदित्य पवार, मयुरेश लाड, राजस चव्हाण, ओम संकपाळ, वरद माने, तुषार लोंढे, रोनित पवार, अर्णव पांचाळ व आरूष पिंपळे.

**विदर्भ संघ** : कर्णधार वेदांत पडोळ, सर्वेश झुटे, विक्रम दोंदले, अजय सुतार, तुषार करडे, अर्जुन कदम, गितराज कुंभार, हर्षल सानप, सम्राट तोरवे व आदित्य गोडकर.

या सर्व खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल टेनिस क्रिकेट फाउंडर कन्हैया गुजर, महाराष्ट्र सचिव मीनाक्षी गिरी, उपाध्यक्ष विलास गिरी, महिला संचालिका धनश्री गिरी, तांत्रिक संचालक स्वप्निल ठोंबरे, नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड, सिंधुदुर्ग जिल्हा सचिव कुणाल हळदणकर, तसेच दर्शन थोरात यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले.संघास मार्गदर्शक म्हणून कुणाल हळदणकर, धनश्री गिरी, विजय उंबरे, लखन देशमुख व सोमा बिरादार तर व्यवस्थापक म्हणून विशेष मार्गदर्शन मिळणार आहे.राष्ट्रीय स्तरावर खेळाडू चमकदार कामगिरी करून महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करतील, असा विश्वास संघटनेतील पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.




महाराष्ट्रीयन बिल्डर असोसिएशन च्या वतीने वन मंत्री तथा पालघर चे पालकमंत्री गणेश नाईक यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना सेक्रेटरी तुकाराम दुधे, खजिनदार बाळासाहेब देशमुख, उत्तम येलमार तसेच गजानन लीला चॅरिटेबल ट्रस्ट च्या वतीने वन मंत्री तथा पालघर चे पालकमंत्री गणेश नाईक यांना शुभेच्छा देताना ट्रस्ट , अवधूत पाठारे

( दैनिक युवक आधार )

# भारज बुद्रुक येथील श्री. शिवाजी माध्यमिक व उ. मा. विद्यालय तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत घवघवीत यश

**_दैनिक युवक आधार_**
**_वरूड सर्कल प्रतिनिधी_**
**_ज्ञानेश्वर कुंडलिक निकाळजे_**

जाफ्राबाद तालुक्यातील मौजे भारज बुद्रुक येथील श्री शिवाजी विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय भारज बुद्रुक येथील विद्यार्थ्यांनी क्रिडा व युवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे आणि जिल्हा क्रीडाधिकारी जालना यांच्या संयुक्त विद्यमाने जिः परिषद प्रशाळा जाफ्राबाद येथे तालुकास्तरीय आयोजन करण्यात आले या स्पर्धेत १४ वर्षे वयोगटातील विविध उन्हेंटमध्ये यश संपादन केले यामध्ये ६०० मी. धावणे सारंगधर कोलते प्रथम, आरती मुनउकर प्रथम, धनश्री खंदाडे द्वितीय, गोळा फेक



मध्ये कार्तीक तारू द्वितिय, ४x१०० रिले मध्ये मनस्वी ताक, दिव्या तारू, आरती मुरडकर, गौरी तारू, धनश्री संदाडे तसेच मुलांमध्ये (४×१०० शिले) ऋषीकेश दांडगे, यश तारू, शंकर तारू, श्याम दांडगे, कार्तीक क मुरडकर तसेच १७ वर्षे वयोगटात ३००० मी. धावणे मध्ये गणेया तारू द्वितीय प्रांजल तारू द्वितीय ४०० मी. धावणे मध्ये कोमान फोलाने प्रथम, प्रगती इंगळे द्वितीय, ४x१०० भो रिलमध्ये प्रथम आलेले विध्यार्थी गायत्री शिंदे, कोमल फोलाने, प्रांजल तारू, सोनू दांडगे, प्रगती इंगळे थाळी फ्रेण्ड मध्ये, सचिन देशमुख प्रथम आणि दामधर द्वितियःया खेळाडूंच्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री लूटे सर, क्रिडा शिक्षक ए. ए. मरकड सर एस. एल. मरकड सर तसेच सर्व शिक्षक आणि गावचे सरपंच, पोलीस पाटील, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ आणि संबंधीत पालक यांनी अभिनंदन केलो आणि जिल्हास्तरावर यश मिळविण्यासारी शुभेच्छा दिल्या

# गावाच्या समन्वयातच बदलाची खरी ताकद – ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे

## गावासह लोकप्रतिनिधींसाठी महत्त्वाचे अभियान – पालकमंत्री प्रकाश आबिटकर

**दैनिक युवक आधार**
**कौतुक नागवेकर**
**कोल्हापूर,प्रतिनिधी**

: गावातील प्रत्येक व्यक्ती, गट आणि समूह यांना सहभागी करून गावसमृद्धीची चळवळ यशस्वी करावी. गावाच्या समन्वयातच खऱ्या अर्थाने बदलाची ताकद आहे, असे प्रतिपादन राज्याचे ग्रामविकास व पंचायतराजमंत्री जयकुमार गोरे यांनी केले. गाव समृद्ध होण्यासाठी आणि विकासाला गती मिळण्यासाठी लोकसहभागातून आणि लोकचळवळीतूनच खरा बदल घडेल. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात प्रत्येक गावाने सहभाग नोंदवून बक्षिसासाठी नव्हे, तर गावाच्या विकासासाठी काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले. कोल्हापूर येथे आयोजित मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या जिल्हास्तरीय कार्यशाळेच्या अध्यक्षतेखाली ते बोलत होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याणमंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते झाले. यावेळी खासदार धनंजय महाडिक, आमदार राहूल आवाडे, जिल्हाधिकारी अमोल येडगे, यशदाचे उपसंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., अपर आयुक्त नितीन माने, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी यांच्यासह जिल्ह्यातील ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामसेवक आणि गटविकास अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांनी उपस्थितांचे स्वागत केले. ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, 'कोल्हापूर येथे ऐतिहासिक कार्यशाळेचे आयोजन झाले असून, या जिल्ह्याने राज्यासह देशाला अनेक दिशादर्शक आणि मार्गदर्शक



योजना दिल्या आहेत. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातूनही जिल्ह्यात चांगले काम होऊन प्रत्येक गाव समृद्ध होईल, अशी अपेक्षा आहे. ५ कोटी रुपये बक्षीस देणारे हे देशातील एकमेव अभियान आहे. प्रत्येक गाव समृद्ध झाले, तर राज्यही समृद्ध होईल.' वाढत्या शहरीकरणाच्या काळात गावांना समृद्ध करणे आवश्यक आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या सर्व योजनांची गावपातळीवर प्रभावी अंमलबजावणी केल्यास गावाचा सर्वांगीण विकास होईल, असेही ते म्हणाले. गेल्या सहा महिन्यांत राज्यात ३० लाख घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. घरकुलांच्या अनुदानात वाढ, बांधकामासाठी मोफत वाळू, ज्यांना जागा नाही त्यांना घरकुलासाठी जागा, तसेच सौरऊर्जा प्रकल्प यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. येत्या ९० दिवसांत सर्व योजनांची यशस्वी अंमलबजावणी करून गावांना समृद्ध करावे आणि कोल्हापूर जिल्ह्याने यात अग्रस्थान मिळवावे, असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

गावासह लोकप्रतिनिधींसाठी महत्त्वाचे अभियान – पालकमंत्री प्रकाश आबिटकर

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान गावासह लोकप्रतिनिधींसाठी अत्यंत महत्त्वाचे आणि आवश्यक आहे. गावाच्या विकासात योगदान देताना प्रत्येकाने या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले. त्यांनी गावातील विकास प्रक्रियेला बळ देणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. जिल्ह्यातील मंजूर घरकुलांच्या बांधकामातील अडचणी सोडवून येत्या २६ जानेवारी रोजी ५० हजार लाभार्थ्यांना घरांच्या चाव्या प्रदान करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. समृद्ध शाळांसाठी ७८ कोटी रुपये, तर पुढील कालावधीसाठी ६०० कोटी रुपये मंजूर झाले असून, समृद्ध प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठीही मोठी तरतूद करण्यात आली आहे, अशी माहिती त्यांनी दिली. कार्यशाळेत प्रारंभी जिल्हास्तरीय आर. आर. (आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते झाले. तसेच, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान वाचन साहित्याचे प्रकाशन, डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या 'मी विकास यात्री' पुस्तकाचे प्रकाशन, 'सुंदर माझे घरकुल' स्पर्धेची घोषणा आणि 'स्वच्छता ही सेवा' उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. खासदार धनंजय महाडिक यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या ११० ग्रामविकास योजनांची यशस्वी अंमलबजावणी करून विकासाला गती देण्याचे आवाहन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांनी प्रास्ताविकात अभियानाची सविस्तर माहिती दिली.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत राबवण्यात येणाऱ्या या अभियानाची पूर्वतयारी १ ऑगस्ट २०२५ पासून सुरू आहे. यात ग्रामपंचायत, तालुका आणि जिल्हास्तरीय प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात येत आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील सरपंच, ग्रामसेवक आणि गटविकास अधिकाऱ्यांचा सहभाग असलेली ही कार्यशाळा त्याचाच एक भाग आहे. ग्रामविकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी, लाभ गावातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवणे, लोकसहभागाची चळवळ उभारून आरोग्य, शिक्षण, उपजीविका आणि सामाजिक न्याय क्षेत्रात पंचायतराजला गतिमान करणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. या अभियानात राज्यस्तरावर प्रथम येणाऱ्या ग्रामपंचायती आणि जिल्हा परिषदेला प्रत्येकी ५ कोटी रुपये बक्षीस दिले जाणार आहे.

# अलिबागमधील जमिनी प्रकरणात सुहाना खान अडकणार? महसूल यंत्रणा 'पैशाला' वाकलेली, सामान्य माणूस मात्र धक्के खातो!

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

अलिबाग तालुक्यातील थळ येथे बॉलिवूड अभिनेता शाहरुख खानची मुलगी सुहाना खान हिने केलेल्या जमीन खरेदी व्यवहारावर मोठा वादंग उठला आहे. सरकारी जमीन खासगी व्यक्तीला देण्याचा प्रकार उघड झाल्याने महसूल विभागातील कारस्थाने जनतेसमोर आली आहेत. १२ कोटींच्या या व्यवहारावर तक्रार दाखल झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने तहसील कार्यालयाकडून अहवाल मागवला; मात्र तहसील कार्यालयाने दिलेला अहवाल अस्पष्ट असल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाने तो धुडकावून लावून नवा, सुस्पष्ट अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.या प्रकरणात सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, खोटे कुटुंबीय बनून विक्री परवानगीसाठी १४ फेब्रुवारी २०२२ रोजी अर्ज दाखल करण्यात आला होता. त्यावर तहसील कार्यालयाकडून अहवाल मागवण्यात आला होता. पण जमीन खरेदीची नोंदणी होताच अवघ्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे २ जून २०२३ रोजी तत्कालीन मंडल निरीक्षक आर.एन. मांढरे यांनी अहवाल सादर केला. एवढी तत्परता सामान्य शेतकरी वा गावकऱ्यांच्या प्रकरणात का दाखवली जात नाही, असा संतप्त सवाल जनतेकडून उपस्थित केला जात आहे.



याच प्रकरणात तीन वेगवेगळे अहवाल तयार झाले.पहिला अहवाल अस्पष्ट, दुसरा मोघम ज्यामध्ये शर्तीचे उल्लंघन मान्य केले, तर तिसरा अहवाल गुलदस्त्यातच ठेवण्यात आला असून त्यात वादग्रस्त तीन बांधकामे दुसऱ्याच जमिनीत असल्याचे नमूद असल्याची माहिती बाहेर आली आहे. इतक्या गंभीर आरोपांनंतरही महसूल यंत्रणा मौन बाळगून आहे.तक्रारदारांचे म्हणणे आहे की, सरकारी जमिनीचा ताबा सुहाना खान हिला खोट्या कुटुंबीयांच्या माध्यमातून मिळवून देण्यात आला. मात्र मंडल निरीक्षकांनी त्यांच्या अहवालात याबाबत एक शब्दही नमूद केलेला नाही. इतकेच नव्हे तर, एका सरकारी जमिनीबाबत दोन मंडल निरीक्षक तीन वेळा जागेवर जाऊनही तक्रारीतील मुख्य मुद्दे स्पष्ट करू शकले नाहीत, यावरून महसूल विभागातील मोठ्या गैर व्यवहाराचा संशय बळावतो आहे."सामान्य माणूस कायदेशीर हक्काच्या जमिनीसाठी वर्षानुवर्षे महसूल खात्याचे उंबरे झिजवत राहतो. त्याचे अर्ज वर्षानुवर्षे धूळ खात पडून राहतात. पण पैसा आणि दबाव असेल तर दुसऱ्याच दिवशी अहवाल तयार होतो. महसूल खात्यात खरी स्थिती 'ये पैसा बोलता है' अशीच आहे," असा संतप्त सूर रायगड जिल्ह्यात जनतेत उमटतो आहे.या व्यवहारामागे राजकीय दबाव असल्याचे बोलले जात आहे. शासकीय जमिनीच्या चतु:सीमेबाबत महसूल खात्याच्याच नकाशांत आणि कागदपत्रांत गोंधळ असल्याने या जमिनीची शासकीय मोजणी करणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. तक्रारदारांनी या प्रकरणाची तक्रार थेट लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे दाखल केली असून, या प्रकरणाचा तपास होण्याची मागणी जनतेतून जोर धरत आहे. अलिबागमधील सरकारी जमिनीचा खेळ 'बड्या घरातील' लोकांच्या दबावाखाली होतोय का? सामान्य माणूस न्यायासाठी धडपडतोय आणि महसूल यंत्रणा मात्र पैशासमोर गोंजारतेय ,या प्रश्नाचे उत्तर शासनाने जनतेला द्यायलाच हवे!



इंदापूर तालुक्यातील जंक्शन येथे नुकतीच मातंग समाजाची आढावा बैठक पार पडली.अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त इंदापूर आणि बारामती तालुक्यातील मातंग समाजासाठी काम करणाऱ्या विविध संघटनांचे प्रतिनिधी या बैठकीत एकत्र आले होते.समाजातल्या विविध प्रश्नांवर चर्चा करणे हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता.या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे जिल्हाध्यक्ष प्रदीप दादा गारटकर मातंग एकता आंदोलनांचे प्रदेसचिव दिलीप सोनवणे राजूभाऊ मांढरे शिवसेनेचे वाहतूक आघाडी अध्यक्ष बापू भिसे, दलित महासंघाचे जिल्हाध्यक्ष छगन नाना गायकवाड, मातंग एकता ता.अध्यक्ष शरद नाना गायकवाड,आणि भाजपचे इंदापूर पं.चिटणीस अविनाश मोहिते यांसारखे मान्यवर उपस्थित होते.या सर्व नेत्यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.या वेळी यलप्पा देवकुळे इंगळे सर आणि दिलीप सोनवणे यांनी आपले विचार व्यक्त केले.या कार्यक्रमाला सत्यशोधक बहुजन आघाडीचे मा.ता.अध्यक्ष अमोल मोरे दत्ता मोरे सोमा मोरे अक्षय मोरे आदेश पवार दिलीप शिंदे प्रकाश अडागळे शुभम सोनवणे पैलवान बबनदादा सोनवणे आणि इतर अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्व. माणिक पोदार लर्न स्कूल मध्ये इन्व्हेस्टिचर सेरेमनी संपन्न

**दैनिक युवक आधार**
**..रिसोड प्रतिनिधी. रणजितसिंह ठाकुर**

दि. 13 सप्टेंबर 2025 रोजी स्व. माणिक पोदार लर्न स्कूल मध्ये इन्व्हेस्टिचर सेरेमनी हा कार्यक्रम शाळेच्या परिसरात मोठ्या उत्साहाने पार पडला. विद्यार्थ्यांच्या अंगी अभ्यासाबरोबर शिस्त, वक्ताशीरपणा या गुणांची जोपासना होण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी शाळेचे अध्यक्ष विनायकराव जाधव, सीमा मापारी तर प्रमुख पाहुण्यामध्ये सुभेदार ज्ञानेश्वर खंडारे उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वती यांच्या प्रतिमेची पूजन करून हारार्पण करून दिपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमांमध्ये शाळेचे प्राचार्य शाळेच्या ध्वजाचे अनावरण करून या दिनाच्या निमित्ताने शाळेचा ध्वज फडकविण्यात आला. यावेळी सोबत शाळेचे शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते. कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी आपापल्या हाऊस




नुसार सुंदर प्रात्यक्षिके पाहुण्यांसमोर सादरीकरण केले. तसेच पथसंचलन करून सर्वांची मने जिंकली. यासोबतच शाळेचे हेड बॉय हेड गर्ल तसेच इत्यादी मुख्य पदावरील प्रतिनिधींनी आपल्या पदाची शपथ घेऊन येणाऱ्या काळात आपल्या कार्याची माहिती दिली. यावेळी अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बॅचेस लावून त्यांचा सन्मान करण्यात आला. या सेरेमनी मध्ये शाळेतील विविध विभागांमध्ये विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. हेडबॉय म्हणून अक्षद खानझोडे हेड गर्ल म्हणून श्रीया हवा स्पोर्ट कॅप्टन विराज देशमुख स्पोर्ट व्हॉइस कॅप्टन आयुष मापारी कल्चलर कॅप्टन अक्षरा खानझोडे कल्चलर व्हॉइस कॅप्टन अभिराज बियाणी डिसिप्लिन कॅप्टन अभय गरकळ डिसिप्लिन व्हॉइस कॅप्टन एकांश जोशी क्लीलनीनेस कॅप्टन आर्यन वाघ क्लीलनीनेस व्हॉइस कॅप्टन सार्थक देशमुख टेकनॉलॉजि कॅप्टन शास्वत पतंगे टेकनॉलॉजि व्हॉइस कॅप्टन माही मेहता ट्रान्सपोर्ट कॅप्टन जय साबळे ट्रान्सपोर्ट व्हॉइस कॅप्टन ज्ञानेश्वरी वाघ तसेच शाळेतील हाऊस नुसार सुद्धा विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये एकवा हाऊस कॅप्टन इशांत तोष्णीवाल एकवा हाऊस व्हॉइस कॅप्टन ओम खानझोडे इगनीस हाऊस कॅप्टन गौरांग देशमुख इगनीस हाऊस व्हॉइस आर्या देशमुख टेरा हाऊस कॅप्टन शिवराज खानझोडे टेरा हाऊस व्हॉइस कॅप्टन आदर्श नागरे व्हेंटस हाऊस कॅप्टन तनिष देशमुख व्हेंटस हाऊस व्हॉइस कॅप्टन शरयू बुट्टे यांची शालेय विद्यार्थ्यांची निवडणूक घेऊन निवड करण्यात आली. शाळेच्या प्राचार्य हर्षल वासेवाल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच सुभेदार ज्ञानेश्वर खंडारे यांनी विदयार्थ्यांना बहुमूल्य मार्गदर्शन केले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी मार्च पास्ट सादरीकरण करून सर्वांची मने जिंकली. कार्यक्रमाची प्रस्तावना शाळेतील विद्यार्थी अनुश्री वाघ व माही भोपाळे यांनी केले व आभार प्रदर्शन अभिराज बियाणी याने केले. यावेळी विद्यार्थी, शिक्षक, पालक, विद्यार्थी शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# प्रबोधनकार भीम शाहीर प्रदीप कडबे यांचा सत्कार,

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**



**नागपूर :** खापरखेडा चणकापूर येथे बुद्ध धम्म प्रचारक आदर्श कवी मंडळ नागपूर, आणि सदानंद भजन मंडळ यांच्या संयुक्त सहकार्याने, स्मृती शेष कवी गायक प्रबोधनकार सदानंद नारनवरे यांच्या १४ वा स्मृतिदिनाचा कार्यक्रम दिनांक-15/09/2025 रोज रविवारला सकाळी 10 ते 5 वाजेपर्यंत स्थळ- आदर्श धम्म प्रचारक केंद्र खापरखेडा चणकापूर येथे आदरांजली कार्यक्रम पार पडला. सर्वप्रथम विश्वाला शांतीच्या संदेश देणारे महाकारुणिक तथागत भगवान गौतम बुद्ध, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, बोधिसत्व, परम पूज्य महामानव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी रामटेक तालुक्यातील किरणापुर येथील गायक भीम शाहीर प्रदीप बागवान कडबे यांनी आपल्या गायनाच्या माध्यमातून प्रज्ञा सूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विज्ञानवादी विचार मांडून. ( दिली तू आम्हा बोधी वृक्षाची छाया. कसे ऋण फेडू तुझे भिमराया, आम्हा लावली तू जिवापाड माया, कसे ऋण फेडू तुझे भिमराया. क्रांतिकारी गीत सादर केले त्यांच्या जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी केंद्रीय अध्यक्ष रवींद्र बोरकर, भदंत नाग दीपंकर महाथेरो, प्रकाश लांजेवार, विजय उ के, सुधाकर पाटील, श्रीधर तागडे, मिलिंद पाटील, पुंडलिक मेश्राम, रामदास जी तागडे, मोतीराम लांजेवार, चंद्रमणी शेंडे, रवींद्र चव्हाण, अमर रंगारी, शाहीर केशव शेंडे, कैलास सहारे, युवराज अडकणे, भीमराव पाटील, रमेश निकोसे सुरेश ढोके, केंद्रीय सचिव सविता नारनवरे, भीम शाहीर प्रदीप कडबे, भाऊराव गोंडाने, मनोहर जामगडे, रमेश रामटेके, भामा सोमकुवर, यमुना लांजेवार, इत्यादी मोठ्या संख्येने गायक कवी उपस्थित होते.

# इंद्रराज महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी प्रो. डॉ. जी.जी. राजपूत यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

– सिल्लोड येथील इंद्रराज कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे हिंदी विभागात कार्यरत असलेले प्रोफेसर व विभागप्रमुख डॉ. गुरुदत्त गिरधरसिंग राजपूत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी इंद्रराज महाविद्यालयाच्या प्राचार्य पदाचा पदभार नुकताच डॉ. व्ही. बी. लांब यांच्याकडून स्वीकारला आहे. यावेळी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक देवरे तसेच उपप्राचार्य डॉ व्ही बी लांब, डॉ राजपूत यांच्या सुविद्य पत्नी शीतल राजपूत, स्नेही विनोद शेवतेकर, महाविद्यालयाचे आय.क्यू.एसी. समन्वयक डॉ. संतोष चौथाईवाले , कार्यालयीन अधीक्षक किरण राजपूत तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.
आगामी काळात महाविद्यालयाच्या विकासासाठी प्रयत्नरत राहील असा संकल्प नवनियुक्त प्राचार्यांनी बोलून दाखवला याप्रसंगी सर्वांनी त्यांचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या.



# राजेश पाटील शिरसाट यांच्या वाढदिवसानिमित्त वाशिम मध्ये वृक्षारोपण.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी**
**वाशिम गजानन पवार पाटील**



**वाशिम:**-आमचे मार्गदर्शक तथा लोकप्रिय,कर्तव्यदक्ष केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन अमरावती झोन उपाध्यक्ष तथा वाशिम जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष माननीय राजेशजी पाटील शिरसाट आज वाढदिवस यांचा आज वाढदिवस औचित्य साधत व मा.सहाय्यक आयुक्त साहेब यांच्या गाईडलाईन नुसार पुष्पगुच्छ,बुके न देता तालुक्यातील केमिस्ट 10 ते 12 झाडाचे रोपटे लावून वृक्षवल्ली आपल्या अध्यक्षांना शुभेच्छा.
वृक्षारोपण करताना राधाकृष्ण मेडिकल एजन्सी चे संचालक संतोष पाटील जावळे माजी नगरसेवक राजूभाऊ वानखेडे ,विजू गोरे ,निंबालवर अप्पा नानु वाकुडकर,संतोष पवार, मारोती मुके,सुरेश ठाकरे.

# "एकाच घरातून दोन विजेते : जिल्हा बुद्धिबळ स्पर्धेत मोगल भावंडांचा विजय"





**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

नाशिक तालुक्यातील कोठुरे या छोट्याशा गावाने गेल्या दोन दिवसांत अभिमानाने डोके वर काढले आहे. कारण गावातीलच दोन भावंडांनी जिल्हा स्तरावरील शालेय बुद्धिबळ स्पर्धेत चमकदार कामगिरी करत आपला विजयाचा ठसा उमटवला आहे.
नुकत्याच नाशिक येथे पार पडलेल्या या स्पर्धेत कु. कृष्णा अतुल मोगल याने अप्रतिम खेळी करत प्रतिस्पर्ध्यांना धूळ चारली. तब्बल ७ पैकी ७ सामने सलग जिंकून त्याने पहिला क्रमांक पटकावला. या प्रभावी विजयामुळे आता त्याची नंदुरबार येथे होणाऱ्या विभागीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.
याच स्पर्धेत त्याची बहिण कु. ओवी अतुल मोगल हिनेही तितकीच दमदार कामगिरी साकारली. स्वा. सावरकर विद्यालयाची ही विद्यार्थीनी असून तिनेही ७ पैकी ७ सामने जिंकत थेट विजेतेपद मिळवले. कृष्णाप्रमाणेच तिचीही विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. एका घरातील दोन भावंडांनी जिल्हा बुद्धिबळ स्पर्धा जिंकण्याची दुर्मिळ कामगिरी करून दाखवली आहे.
या यशामागे त्यांचे वडील अतुल दीपक मोगल यांचे मोलाचे योगदान आहे. शेतकरी कुटुंबातून आलेले मोगल सर निफाड येथे अचिव्हर्स चेस अकॅडेमीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बुद्धिबळाचे प्रशिक्षण देतात. मर्यादित साधनसामग्री असतानाही त्यांनी आपल्या मुलांना खेळाचे धडे दिले. आज त्यांची मेहनत आणि चिकाटी यांचे फळ संपूर्ण जिल्ह्यासमोर आहे.
गावातील तसेच जिल्ह्यातील शिक्षक, शाळा व्यवस्थापन, क्रीडाप्रेमी आणि ग्रामस्थांनी कृष्णा व ओवीच्या यशाचा गौरव केला आहे. गावाच्या सरपंच सौ. सरला उत्तम बुटे म्हणाल्या, "या दोन्ही मुलांच्या कामगिरीमुळे कोठुरे गावाचे नाव जिल्ह्यात गाजले आहे. भविष्यात ते राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकतील, अशी आम्हा सर्वांची अपेक्षा आहे."
स्पर्धेत मिळवलेला त्यांचा एकतर्फी विजय नाशिकपुरता मर्यादित न राहता संपूर्ण विभागात चर्चेचा विषय ठरला आहे. शालेय जीवनात असतानाच त्यांनी साधलेले हे शिखर इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे.
याबाबत बोलताना अतुल मोगल म्हणाले, "बुद्धिबळ हा केवळ खेळ नसून तो विचारांची ताकद, संयम व रणनीती विकसित करणारा आहे. मुलांनी जिंकलेली ही स्पर्धा त्यांच्या पुढील प्रवासातील पहिली पायरी आहे. गावकऱ्यांनी व शिक्षकांनी दाखवलेला विश्वास हाच आमचा खरा आधार आहे."
सध्या कृष्णा आणि ओवी यांच्यावर सर्वत्र शुभेच्छांचा वर्षाव होत असून, येत्या विभागीय स्पर्धेत तेच आत्मविश्वासाने आणखी मोठे यश संपादन करतील, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# सणसर येथील पुराच्या पाण्याचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी

### कृषीमंत्री भरणे मामाकडे चारी विभागातील कर्मचारी यांच्यावर कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**
**सणसर : विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यात १४ सप्टेंबर रोजी रात्रीपासून सकाळपर्यंत सुमारे १२ तास झालेल्या मुसळधार पावसामुळे सणसर येथील ओढ्याला पूर आला. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे आणि ओढ्यालगतच्या घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सणसर येथे भेट दिली.त्यांनी कृषी आणि महसूल विभागाला नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांचे तातडीने पंचनामे करून शासनामार्फत नुकसान भरपाई देण्याचे निर्देश दिले.

एप्रिल महिन्यात चारी विभाग माळेगाव यांना माहिती अधिकार संघटनेचे तालुका अध्यक्ष विकास क्षत्रिय यांनी सणसर ओढा खोलीकरण करून मिळावे म्हणून निवेदन देण्यात आले असून आज दोन वेळा पूर येऊन सुद्धा चारी विभाग माळेगाव येथील कर्मचारी अधिकारी यांनी गांभीर्याने त्या निवेदनाची दखल घेतली नसल्यामुळे ही पूर परिस्थिती झाली असल्यामुळे अश्या कामचुकार कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी म्हणून लवकर जिल्हाअधिकारी पुणे यांच्याकडे तक्रार देऊन कारवाई करण्याची मागणी करण्यात येणार आहे.
मा. विकास क्षत्रिय
अध्यक्ष माहिती अधिकार इंदापूर तालुका

कृषीमंत्री भरणे यांनी सांगितले की, सध्या पाऊस सुरू असून काहीवेळा अचानक तीव्र पाऊस पडत आहे. यामुळे ओढे-नाल्यांना पूर येत आहे. हवामान खात्याच्या अंदाजा नुसार १९ सप्टेंबरपर्यंत पाऊस कायम राहण्याची शक्यता आहे,त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे.



इंदापूर तालुक्यातील सणसर आणि परिसरात सुमारे १५६ मिलिमीटर (सहा इंच) पावसाने पूरस्थिती निर्माण झाली असून लवकर याची व्यवस्था करण्यात यावी म्हणून सरपंच यशवंत पाटील रणजित निंबाळकर शब्बीर काझी सुमित पाटील पार्थ निंबाळकर विक्रमसिंह निंबाळकर प्रविण शिंदे किरण गायकवाड अक्षय निंबाळकर विक्रम भैय्या निंबाळकर राहूल जगताप सागर गुप्ते यांनी मागणी केली आहे

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# आदिवासी शक्ती सेना महाराष्ट्र राज्य यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक :युवक आधार**
**पिंपळगाव बसवंत प्रतिनिधी -कृष्णा गायकवाड**



आदिवासी समाज (S.T) प्रवर्गात इतर समाज घटकांचा समावेश करू नये.

नुकतच मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर सरकारने हैदराबाद गॅझेटीइयर लागू केले आहे मराठा समाजाला हैदराबाद गॅझेटिअर च्या नोंदी नुसार कुणबी प्रमाणपत्र देण्याचा जीआर काढला त्या नंतर याच हैदराबाद गॅझेटिइयर मध्ये धनगर,बंजारा आणि वंजारी आदिवासी आणि मागासलेले आहे त्यामुळे त्यांचा अनुसूचित जमाती एसटी समावेश करावा अशी मागणी सध्या जोर धरू लागले आहे.

त्यामुळे भविष्यात असे होऊ नये व आदिवासी समाजावर कुठल्याही प्रकारचा अन्याय होऊ नये याकरिता आदिवासी शक्ती सेना महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष अर्जुन भाऊ गांगुर्डे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण आदिवासी समाजाच्या हितासाठी आदिवासी शक्ती सेनेचे सर्व पदाधिकारी पालखेड, दावचवाडी, नांदुर्डी,रेडगाव, वावी, शिरवाडे पाचोरा, ओझर, जानोरी मोहाडी, पिंपळगाव ब तसेच इतर ठिकाणचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

या सर्वांच्या एकमताने सकल आदिवासी समाजाच्या वतीने माननीय जिल्हाधिकारी साहेब जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक तालुका जिल्हा नाशिक यांना मूळ आदिवासी समाज (ST) प्रवर्गात इतर समाज घटकांचा समावेश करू नये तसेच आम्ही सकल आदिवासी हे महाराष्ट्रातील मूळ आदिवासी मूळनिवासी आहोत आम्हा आदिवासी बांधवांना (ST) कॅटेगरी article 341भारतीय संविधानाने कायदेशीररित्या आरक्षण संविधानात्मक मार्गाने दिलेले आहे असे असताना सध्याच्या परिस्थितीत काही इतर समाज घटक बेकायदेशीररित्या (ST) प्रवर्गात इतर समाजाचा समावेश करावा यासाठी अतोनात प्रयत्न करत आहेत तरी भारतीय घटनेने मूळ आदिवासी बांधवांना दिलेले आरक्षण हे संविधानात्मक मार्गाने दिलेले असल्याने इतर कोणत्याही प्रवर्गात मूळ (ST) प्रवर्गात आरक्षणात अंतर्भाव करण्यात येऊ नये तसेच महाराष्ट्र राज्य विधिमंडळ यास आपण या निवेदनाद्वारे सूचित करावे की अशा प्रकारचा कुठल्याही प्रकारचा बेकायदेशीर रित्या जीआर इतर समाजाचा आदिवासी समाजात अंतर्भाव करण्याचा पारित करण्यात येऊ नये ही सकल आदिवासी बांधवांच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

याप्रसंगी राजू माळी, पुंजाराम माळी, अनिल मोरे, शिवाजी पवार, रवींद्र मुकणे, समाधान मोरे, दीपक सोनवणे,अमोल भागवत, कैलास सूर्यवंशी, अरुण कोकाटे,विष्णू सूर्यवंशी, गणेश मोरे, समाधान बर्डे, भगवान कोकाटे,नवनाथ दिवे, राहुल कराटे,रवींद्र कोकाटे, गोविंद कराटे, अजय दिवे, संदेश कराटे,दीपक कोकाटे, विनायक कोकाटे, राहुल कुऱ्हाडे,आकाश माळेकर, सागर दिवे, कृष्णा कडाळे, ज्ञानेश्वर सोनवणे,धर्मेंद्र गांगुर्डे,दिगंबर कोकाटे,तुषार दिवे,मधुकर कोकाटे, आबाजी गांगुर्डे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळेस आदिवासी शक्ती सेना महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे सांगण्यात आले जर आदिवासी समाजावर कुठल्याही प्रकारचा अन्याय होत असेल तर सकल आदिवासी समाज हा गप्प बसणार नाही आदिवासी समाज हा पेटून उठल्याशिवाय राहणार नाही .

त्यामुळे आदिवासी समाजावर कुणीही अन्याय करू नये तो अन्याय आम्ही सहन करून घेणार नाही सर्व आदिवासी समाजाने एकत्र येण्याची गरज असे ही यावेळेस म्हटले आहे.

# श्रीवर्धन शहरात खासदार सुनिल तटकरे यांच्या हस्ते विविध विकास कामांचे भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**

श्रीवर्धन शहराच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलत आज माननीय खासदार सुनिल तटकरे साहेबांच्या हस्ते विविध विकास कामांचे भूमिपूजन पार पडले.



महानगर गॅस लिमिटेड यांच्या सी.एस.आर. फंडातून नगरपालिका शाळा क्रमांक २ च्या नूतनीकरणाचे काम तसेच आर.सी.एफ. यांच्या सी.एस.आर. फंडातून नगरपालिका शाळा क्रमांक ३ च्या नूतनीकरणाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. या उपक्रमामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना सुधारित व आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार आहेत.

यानंतर श्रीवर्धन येथील शासकीय विश्रामगृहात नागरिक व शासकीय अधिकारी यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत खासदार तटकरे यांनी सुरू असलेल्या तसेच प्रलंबित विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला. स्थानिक पायाभूत सुविधा, शैक्षणिक विकास आणि नगरविकासाशी संबंधित विविध विषयांवर महत्त्वपूर्ण चर्चा झाली.

या भूमिपूजन आणि बैठकीमुळे श्रीवर्धन शहरात विकासाची नवी ऊर्जा निर्माण झाली असून नागरिकांमध्ये समाधान व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# 'समाज माध्यम गौरव २०२५"राज्यस्तरीय पुरस्काराने शेख अब्दुल रहीम सन्मानित!

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर वार्ताहर**



शेख अब्दुल रहीम यांना विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल वसुधा फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने "समाज माध्यम गौरव पुरस्कार-२०२५" या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा सन्मान काल पुणे येथील भारतीय विचार साधना सभागृहात आयोजित पहिली माध्यम परिषद कार्यक्रमात अनेक मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन मा. श्री. प्रमोद सूर्यवंशी (संपादक, आम्ही मुंबईकर साहित्यिक वृत्तपत्र) यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. आशिष तागडे (उपसंपादक, सकाळ), तर परिषदेचे अध्यक्ष डॉ. मधुसूदन घाणेकर (अध्यक्ष, पहिले विश्व साहित्य संमेलन २०११) उपस्थित होते. वसुधा फाउंडेशनच्या संस्थापिका सौ. वसुधा वैभव नाईक यांनीही आपली उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाला विशेष औचित्य लाभविले.

याच आठवड्यात शेख अब्दुल रहीम सरांना मिळालेला हा दुसरा सन्मान आहे. यापूर्वी त्यांची "वीर शिवछत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार" साठी अनाथ सेवक सामाजिक कल्याण संस्था, अहिल्यानगर यांनी निवड केली आहे.

शेख अब्दुल रहीम सरांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरावरून कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. हा सन्मान त्यांनी आपल्या हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन परिवाराला समर्पित केला आहे.

# दारव्हा नगरपरिषद तील कोट्यावधी च्या कामावर भ्रष्टाचाराचा आरोप: मनसेचा इशारा घंटा.

दैनिक युवक आधार.
किशोर कांबळे तालुका प्रतिनिधी दारव्हा.

**मनसे तालुकाध्यक्ष लाला पांडे यांचा आरोप.**

* कोट्यावधीच्या कामावर नगरपरिषदेत भ्रष्टाचार.
* अभियंता विकी कलोसे ठेकेदाराच्या बाजूने गप्प.
* काही घराच्या आतच नाले बांधल्या जात आहे.
* अतिक्रमण कारवाईत दुहेरी निकष- गरिबावर कारवाई, ठेकेदार मोकळे.
* गोळीबार चौकातील व्यापाऱ्यांची पुनर्वसन न करता कारवाई.
* तात्काळ जबाबदार अधिकारी नेमून ठेकेदाराच्या मनमानीला आळा घाला.

नगरपरिषदेत चालू असलेल्या कोट्यावधी रुपयाचे कामामध्ये थेट भ्रष्टाचार होत असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका अध्यक्ष लाला पांडे यांनी केला आहे. त्यांनी नगर परिषदेचे मुख्याधिकारी. उपविभागीय अधिकारी. आणि जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करत" नगरपरिषदेतील कारभार पूर्णपणे बेफिकीर आणि ठेकेदार शाही च्या पंखा खाली चालतो आहे. असा थेट आरोप लावला आहे. शहरात नाट्यगृह. क्रीडा संकुल.नाले. रस्ते.यवतमाळ रोडवरील सर्विस नाले. दिग्रस बायपासवरील सर्विस रस्ते. अशी कोट्यावधी रुपयाची कामे सुरू आहेत. मात्र.या सर्व कामावर देखरेख करणारे अभियंता विकी कलोसे यांनी डोळे झाक केले असून ठेकेदारांना मोकळे रान दिले आहे. त्यामुळे कामाची गुणवत्ता खालावत असून नागरिकांची दिशाभूल केली जात आहे. भ्रष्टाचाराची हे उघड उघड मेजवानी नगर परिषदच. पुरवत आहे. असा आरोप पांडे यांनी केला. त्याचबरोबर शहरात काही नाले. शहरात काही सरळ घराच्या आत बांधल्या जात असल्याचे धक्कादायक प्रकार पांडे यांनी उघड केले. अतिक्रमण कारवाईत ही दुहेरी निकष लावले जात असल्याचे त्यांनी म्हटले. गरीब आणि सर्वसामान्यांचे अतिक्रमण झटपट हटवले जाते. मात्र सत्ताधाऱ्यांच्या जवळ असलेल्या ठेकेदारावर किंवा प्रभावशाली लोकांवर प्रशासन गप्प बसते. हे भूमिका उघडपणे भ्रष्टाचार पक्षपात करणारी असल्याची पांडे यांनी ठणकावले. गोळीबार चौक आणि नर्सिंग होम समोरील अतिक्रमण काढताना व्यापाऱ्यांचे पुनर्वसन न करता केलेली कारवाई अन्यायकारक असल्याचेही त्यांनी नमूद केले. जिथे ठेकेदार आणि सत्ताधारी जोडलेले आहेत. तिथे प्रशासन गप्प बसते. पण सामान्य जनता मात्र अन्यायाला बळी पडते. हा डाव आम्ही उधळून लावू. असा इशारा त्यांनी दिला. नगर परिषदेच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांची नेमणूक तातडीने करावी. ठेकेदारांच्या मनमानीला काळा घालावा आणि सर्व कामांचा सार्वजनिक तपास व्हावा. अशी मागणी पांडे यांनी केली. तक्रारीची प्रत उपविभागीय अधिकारी दारव्हा व जिल्हाधिकारी यवतमाळ यांना पाठविण्यात आली आहे. नगरपालिका प्रशासनाने जर या विषयाची गंभीर दखल घेतली नाही तर मनसे स्टाईलने थेट रस्त्यावर उतरून आंदोलन करू असा इशारा लाला पांडे यांनी. दिल्याने दारव्हा शहरात खळबळ उडाली आहे. नगरपरिषद प्रशासन या सर्व बाबीवर काय अक्शन घेतील याकडे सर्व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# मुलांनो व्यसनापासून दूर रहा श्री दिलीप किसनराव आमले व्यसनमुक्ती जनजागृती

**दैनिक युवक आधार**
**नेरुळ प्रतिनिधी**

त्रिमूर्ती व्यसनमुक्ती जनजागृती व नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन विभाग यांच्या वतीने तेरणा इंजिनिअर कॉलेज येथे इंजिनिअर डे दिनानिमित्त रस्ता सुरक्षा व व्यसनमुक्ती जनजागृती अभियान उप प्रादेशिक परिवहन अधिकारी नवी मुंबई मा दत्तात्रय सागोलकर साहेब, मा गजानन गावंडे साहेब सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली त्रिमूर्ती व्यसनमुक्ती जनजागृती आयोजित व्यसनमुक्त जीवन काळाची गरज सादरकरते श्री दिलीप किसनराव आमले आपला माणूस यांच्या विशेष सहकार्याने इंजिनिअर डे दिनानिमित्त 200 पेक्षा जास्त विद्यार्थी यांना व्यसनमुक्त जिवन काळाची गरज का ? याविषयी योग्य मार्गदर्शन संवाद करून मी कधीच व्यसन करणार नाही व्यसन करून वाहन चालवणार नाही अशी प्रतिज्ञा करून घेतली उपस्थित अधिकारी श्री चेतन देवरे मोटार वाहन निरीक्षक परिवहन विभाग मोटार वाहन निरीक्षक यानी रस्ता सुरक्षा याबाबत सिग्नल यंत्रणा, अपघात, रस्त्यावर असलेल्या स्फोट पट्टे सिट बेल्ट का लावतात हेल्मेट मुळं आपला प्रवास कसा सुखाचा याविषयावर मार्गदर्शन केले यावेळी डॉ श्री देवेन शहा प्राचार्य तेरणा इंजिनिअर कॉलेज सर्व प्राध्यापक उपस्थित होते

# "मुरुड-काशीदच्या किनाऱ्यांवर पुन्हा पर्यटनाची लाट – मुरुड जंजिरा किल्ला 2 ऑक्टोबरपासून खुला"

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**



मुरुड जंजिरा किल्ला २ ऑक्टोबरपासून पर्यटकांसाठी खुला,कोकणातील पर्यटन व अर्थकारणाला नवी चालना मिळणार. कोकण किनारपट्टीवरील ऐतिहासिक व अद्वितीय असा जंजिरा किल्ला येत्या २ ऑक्टोबरपासून पुन्हा पर्यटकांसाठी खुला होणार असल्याची माहिती पुरातत्त्व विभागाचे अधिकारी बंजरंग येळीकर यांनी दिली. सध्या किल्ल्याची सफाई व आवश्यक कामांना वेग देण्यात येत असून पर्यटकांना सुखद अनुभव देण्यासाठी स्थानिक प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत.कोकणातील हिरवळ, नारळी–पोफळीच्या बागा, स्वच्छ किनारे आणि डोंगरकपारीत वसलेली गावे या निसर्गरम्य पार्श्वभूमीवर उभारलेला जंजिरा किल्ला हा मुरुड, काशीद, नांदगाव, श्रीवर्धन, अलिबाग, नागाव, रेवदंडा, आक्षी, किहीम आदी परिसरातील प्रमुख आकर्षण मानला जातो. दरवर्षी हजारो पर्यटक येथे भेट देतात. मात्र गेल्या काही महिन्यांपासून किल्ला बंद असल्याने स्थानिक पर्यटन, हॉटेल व्यवसाय आणि इतर आर्थिक घडामोडींवर मोठा परिणाम झाला होता.राजपुरी जेटीवर भरतीमुळे पर्यटकांना मोठा त्रास होत असल्याने बोटीधारकांनी स्वखर्चाने तिकीट घरासमोर तात्पुरती जेटी उभारली आहे. दरम्यान, ९३ कोटींच्या खर्चाने बांधलेली नवीन जेटी लवकरच सुरू होणार असून पर्यटकांसाठी मोठी सोय होणार आहे. तथापि, जेट्टीवर सावलीसाठी शेड उभारणे, तसेच तिकीट खिडकी सकाळी ८ वाजता सुरू करण्याची मागणी पर्यटकांकडून होत आहे, कारण पहाटेपासूनच येथे मोठ्या प्रमाणावर गर्दी जमा होते. किल्ल्याच्या अनेक बुरुजांना समुद्राच्या प्रचंड लाटांमुळे भगदाडे पडली आहेत. स्थानिकांनी खंत व्यक्त केली की, गेल्या १५ वर्षांत दुरुस्ती साठी कोणताही निधी उपलब्ध झाला नाही. यामुळे किल्ल्याचे ऐतिहासिक वारसा जतन करण्यास धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे किल्ल्यातील प्रवेश तिकीटातून मिळणारा महसूल दुरुस्ती आणि संवर्धनासाठी वापरण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.पर्यटनावर अवलंबून असलेल्या मुरुड परिसरातील हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह पुन्हा सुरू होणार असल्याने व्यापारी, हॉटेल व्यवसायिक आणि स्थानिक नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. पर्यटकांसाठी शौचालये, पिण्याचे पाणी, सुरक्षाव्यवस्था, मार्गदर्शक सेवा आणि माहिती फलक यांसारख्या मूलभूत सुविधा उभारल्या गेल्यास या परिसरातील पर्यटनाला जागतिक दर्जाची ओळख मिळू शकेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

कोकणाच्या निसर्गरम्य हिरवाईत वसलेला आणि इतिहासाची साक्ष देणारा मुरुड जंजिरा किल्ला पुन्हा एकदा पर्यटकांच्या स्वागताला सज्ज होत असून, या निमित्ताने मुरुड आणि कोकणातील अर्थकारणाला चालना मिळणार आहे.

# मुक्या जनावरांना जीवदान देणारे वाकद येथील शेतकरी कुंदनसिंग

**दैनिक युवक आधार**
**रिसोड. प्रतिनिधी**
**. रणजितसिंह. ठाकुर**



मागील दोन महिन्यापासून वाशिम यवतमाळ बुलढाणा हिंगोली जालना यवतमाळ नांदेड अकोला या जिल्ह्यामध्ये जनावरे यांच्यावर मोठ्या प्रमाणात जनावरे गुरे यांच्यावर लंपी आजाराचा प्रादुर्भाव झाल्याने वाशिम जिल्ह्यासह सर्वच तालुक्यातील शेतकरी बांधव अत्यंत संकटात सापडलेले आहे सर्व जिल्ह्यातील कृषी संवर्धन विभाग सुद्धा दक्षतेने यावर काम करीत आहे परंतु पाहिजे तसा उपचार होत नसल्याकारणाने अनेक जनावरे मृत्युमुखी पडत आहे रिसोड तालुक्यात मागील काही महिन्यापासून लंपि विषाणूजन्य रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला होता अनेक जनावरे त्यामुळे बाधित झाली होती या महिन्यात सुद्धा या रोगाने पुन्हा डोक वर काढले असून आत्तापर्यंत रिसोड तालुक्यामध्ये जवळपास 15 गुरे जनावरे लंपि या आजाराने दगावलेले आहेत त्यामध्ये वाकद भर जहागीर लोणी मोप मांगुळ झनक ,या गावातील जनावरे ,त्यांना औषध न मिळाल्यामुळे दगावले लंपी या संसर्गजन्य रोगाचा सर्वात जास्त प्रसार हा बुलढाणा जिल्ह्यातून सुरू झाला व बुलढाणा जिल्ह्यातील लगतच्या तालुक्यामध्ये झपाट्याने वाढला त्यामुळे गुरे जनावरांना खूप मोठा धोका निर्माण झाला अनेक जनावरांना तर लसीकरण करून सुद्धा या रोगाने ग्रासले आहे, बुलढाणा जिल्ह्यातील चिखली व भोकरदन तालुक्यातील अनेक शेतकरी बांधवांना माहिती पडल्यावर रिसोड इथून होमिओपॅथी औषधी घेऊन गेले असता अनेक जनावरांना होमिओपॅथिक औषधीचा लाभ झाल्याचं अनेक शेतकरी बांधवांनी फोन करून सांगितला लंपी हा स्कीन आजार असून प्रामुख्याने माशा , डास या जीवीते कीटकाद्वारे पसरतो त्यामुळे गोठ्यात स्वच्छता नसणे कीटकनाशकाची फवारणी नसणे तसेच जनावराची योग्य निघा न राखणे यामुळे हा आजार उद्भवतो या आजारावर बऱ्याच वर्ष अभ्यास करून वाकद येथील प्रगतशील शेतकरी श्री कुंदनसिंह ठाकुर यांनी होमिओपॅथी द्वारे याचा रामबाण उपाय औषधी शोधून काढला सर्वप्रथम त्यांनी आपल्या स्वतःच्या जनावरावर होमिओपॅथी औषधी देऊन लांबी हा आजार संपूर्ण नायनाट केला त्यानंतर त्यांच्या गावांमध्ये अनेक जनावरांना या औषधी पासून संरक्षण मिळाल्याचं त्या निदर्शनात आले त्यांनी जवळपास ४ जिल्ह्यात विनामूल्य औषधी पोस्टाद्वारे पाठवली त्यानुसार अनेक शेतकरी बांधवांनी त्यांना फोन द्वारे कळवला की पाण्यामध्ये होमिओपॅथीच्या पाच गोळ्या सकाळ दुपार संध्याकाळ पाण्यामध्ये दिले असता औषधीने दिल्याबरोबर अतिशय तापाने फणफणत असलेल्या जनावरांची अवघ्या ६ तासाच्या आत कमी होऊन नंतर चारा खाणे सुरू केला तसेच जनावराच्या अंगावर असलेले फोडे लालसर पणा सुद्धा कमी झाली व लंपी आजाराची फोड संपूर्ण नाहीसे होण्यास सुरुवात झाली आत्तापर्यंत जवळपास ३५०० जनावरांना होमिओपॅथी औषधी द्वारे कुंदनसिंह ठाकुर यांनी जीवनदान दिले कुंदन सिंग ठाकूर रिसोड यांनी जिल्ह्यातील व जिल्हा बाहेरील सर्व शेतकरी बांधवांना नम्र आवाहन केले की कसाही लांपीचा जनावरे गुरांना जडलेला आजार जनावराला ग्रासलेला असला तर कृपया माझ्याशी संपर्क साधावा व विनामूल्य औषधी घेऊन जावी जेणेकरून आपल्या पशुधन आपल्या विदर्भात वाचेल व त्यांना जीवनदान मिळून त्रास होणार नाही व दगावल्या सुद्धा जाणार नाही त्याकरिता रिसोडला येऊन विनामूल्य औषधी घेऊन जावे याबाबत समस्त जनतेला आव्हान केले असून त्यांचा पत्ता. कुंदनसिंह ठाकुर ठाकूर ॲग्रो मशीनरी बँक ऑफ इंडिया समोर रिसोड जिल्हा वाशिम संपर्क करता फोन नंबर 9021769811

# राजापूर तालुक्यातील जि.प.शाळा तारळ धुमाळवाडी येथे शैक्षणिक वस्तू वाटप



**दैनिक युवक आधार**
**राजापूरः- (प्रमोद तरळ)**

तालुक्यातील तारळ धुमाळवाडी येथे निलेश धुमाळ यांच्या अध्यक्षतेखाली
कालिकाई राखणदेव क्रिडा मंडळ धुमाळवाडी आणि दत्तगुरु स्पोर्ट्सचे मालक अमोल जोशी, नितेश परवडी, आणि दत्तगुरु स्पोर्ट्स कमेटी गोवळगाव यांच्या विशेष सहकार्याने आदर्श जि.प शाळा तारळ - धुमाळवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वस्तू वाटप करण्यात आले
. या कार्यक्रमावेळी मुख्याध्यापक गोविंद तुकाराम बाचीफळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच बाचीफळे सर शाळेतील मुलांना शैक्षणिक रित्या प्रोत्साहन देतातच परंतु इतर क्षेत्रात सुद्धा मुलांना सक्षम करण्यास नेहमीच प्रयत्नशील असतात . शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ. सानिका धुमाळ, उपाध्यक्ष. सौं.सुमन म्हाडगूत. के. आर.सी सी. क्रिडा मंडळाचे सचिव श्री रुपेश धुमाळ, विलास बाईत, दिवाकर धुमाळ, संदेश धुमाळ ( बारक्या ) रुपेश धुमाळ ( बाळु ), भिकाजी धुमाळ,माजी उपसरपंच श्री.आत्माराम धुमाळ,विनोद धुमाळ, अभिषेक धुमाळ,हरिश्चंद्र धुमाळ,श्री. मधुकर धुमाळ, प्रकाश धुमाळ उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय ठेवून सतत प्रयत्नशील रहा. (उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर.)

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील**

**मालेगाव** :- सध्याचे युग स्पर्धेचे युग असून विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम घेत अभ्यास करण्याशिवाय पर्याय नाही शिक्षण घेताना विद्यार्थ्यांनी नेहमी उच्च ध्येय ठेवून सतत प्रयत्नशील राहावे असे आवाहन उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांनी अमानी अभ्यासिकेचे उद्घाटन प्रसंगी काढले. आपल्या भाषणात पुढे त्यांनी सांगितले की, आलेल्या संकटांना सामोरे जात आई वडिलांचे परिस्थिती सतत डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थी दशेत फक्त अभ्यासाला प्राधान्य द्यावे. व्यसनाधीनते पासून दूर राहावे हे ध्येय ठेवताना बऱ्याच वेळा संकटाचा सामना करावा लागेल, मात्र त्याला न डगमगता आपले ध्येय गाठण्यासाठी कठोर परिश्रमाची तयारी ठेवून सतत प्रयत्नशील राहावे असे आवाहन विभागीय अधिकारी वैशाली देवकर यांनी केले. त्या अमानी येथील रणजीत सिंह मोहिते पाटील सार्वजनिक वाचनालयाच्या अभ्यासिकेच्या उद्घाटन प्रसंगी केले.





म्हणाले यावेळी मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की, ग्रामीण भागात शिक्षण घेताना अनेक अडचणीचा सामना करावा लागतो आलेल्या समस्यांना सामोरे जावे समस्याचा भाव न करता नवीन संधी सोबत संधीचे सोने करावे असे आवाहन त्यांनी केले त्याचबरोबर त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा चा अभ्यास करताना कोणते साहित्य वाचावे कशाला महत्त्व द्यावे याबाबत मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षा बाबत मार्गदर्शन केले. दि. १५ सप्टेंबर रोजी अमानी येथील रणजीत सिंह मोहिते पाटील वाचनालय अभ्यासीकेचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. असून कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून अशोक गवळी माजी जिल्हा परिषद सदस्य हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून (दुसरे) अशोक प्रल्हाद गवळी, माजी जिल्हा परिषद सदस्य गजानन गवळी, सरपंच अनिल जाधव, अकोला वाशिम जिल्हा सहकारी बोर्डाचे संचालक अनिल गंगाराम जाधव, प्रा. नंदकिशोर गायकवाड, प्रा. गुणरत्न पखाले, देवीदास झळके उपसरपंच अमानी यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. सर्वप्रथम कार्यक्रमाचे उद्घाटक अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बिरसा मुंडा व सरस्वती मातेच्या फोटोचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले याप्रसंगी सर्व मान्यवरांचे, वाचनलयाचे अध्यक्ष अशोक प्रल्हाद गवळी, माजी सरपंच संदीप गवळी, आणि विद्यार्थ्यांच्या वतीने शाल श्रीफळ देऊन पाहुण्याचा सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी माजी जि. प. सदस्य अशोक गवळी, गजानन गवळी, प्रा. नंदकिशोर गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपण नियमित अभ्यास करून चांगल्या पदावर जाऊन आपल्या आई- वडिलांचे तसेच गावाचे नाव उज्वल करावे असे सांगितले प्रास्ताविक अशोक प्रल्हाद गवळी यांनी केले तर संचालन भागवत किल्लारी तर आभार प्रदर्शन अमानीचे ग्राम महसूल अधिकारी जगन महल्ले यांनी मानले, मुलाच्या बसण्याकरिता, अभ्यासिकेसाठी वाचनालयामध्ये स्टुल व टेबल दिलीप मारुती असलकर यांनी दिली असून, जिल्हा परिषद शाळेतर्फे बिरसा मुंडा चा फोटो वाचनाला देण्यात आला कार्यक्रमाला गोपाल गवळी उपाध्यक्ष सेवा सहकारी सोसायटी अमानी, वैभव गवळी वकील, डॉ. गवळी, गजानन झळके, राजु सरनाईक, नारायण गवळी, रामदास झळके, मंगेश गवळी, हनुमान वाघमारे, मोरकर, लठाड, नालटे, खंडारे, मुठाळ, कर्ते, धोंगडे, गोटे, चोंडकर, यांच्या सह शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाहेगाव (सातारा) येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक बाजीराव गोरे यांना बदली निमित निरोप.... विद्यार्थ्यांना अश्रू अनावर.



**दैनिक युवक आधार**
**परतूर- जालना(अशोक ठोके)**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाहेगाव येथील मुख्याध्यापक बाजीराव गोरे यांची प्रशासकीय बदली झाल्यामुळे शालेय व्यवस्थापन समिती व समस्त ग्रामस्थ वाहेगाव (सातारा)यांनी आदर्श असा निरोप समारंभ आयोजित केला होता या प्रसंगी ग्रामस्थांच्या वतीने मुख्याध्यापक बाजीराव गोरे व त्यांची पत्नी डॉ.अनुजा गोरे (बिनगे)यांचा सत्कार सर्व गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आला. मुख्याध्यापक बाजीराव गोरे हे जून-2018 पासून जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक पदावर कार्यरत होते. त्यांच्या या बदलीने प्रत्येक विद्यार्थ्याच्या डोळ्यात अश्रू आले, काही विद्यार्थी तर ओक्सा-बोक्षी रडू लागले आपले लाडके शिक्षक आपल्याला सोडून दुसऱ्या गावात जाणार हे त्यांना सहन होत नवते. आपल्या लाडक्या शिक्षकाला निरोप देत असताना त्यांचे अश्रू अनावर झाले होते.कार्यक्रमाच्या ठिकाणी अतिशय भावनिक असे वातावरण तयार झाले होते.मुख्याध्यापक बाजीराव गोरे यांनी आपल्या जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःच्या मुलाप्रमाणे शिक्षण देऊन, संस्कार लावून, गावातील मुलांमध्ये,गावामध्ये खूप चांगले शैक्षणिक कार्य घडवून आणले आहे.ग्रामस्थानी बाजीराव गोरे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाहेगाव येथे नूतन मुख्याध्यापक म्हणून रुजू झालेले व आष्टी, कोकाटे हादगाव सर्कल परिसरातील वारकरी संप्रदायाचे निष्ठावंत पाईक श्री. ह.भ.प.सोनळकर महाराज यांना पुढील कार्यास खूप खूप शुभेच्या दिल्या.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंबादास पौळ सर तर प्रास्ताविक मनोज काटे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील रामेश्वर काटे, अशोक काटे, कृष्णा काटे नवनाथ काटे रंगनाथ काटे यांच्यासह गावकऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी गावातील सरपंच, उप सरपंच, प्रतिष्ठित नागरिक व शालेय व्यवस्थापन समिती यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# सागरी सुरक्षा चषक २०२५ कबड्डी स्पर्धेला श्रीवर्धन किनाऱ्यावर धमाकेदार सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका**
**प्रतिनिधी - अनिकेत मोहित**

**श्रीवर्धन** : रायगड पोलिस दलाच्या वतीने आयोजित सागरी सुरक्षा चषक २०२५ कबड्डी साखळी स्पर्धा आज श्रीवर्धनच्या ऐतिहासिक समुद्रकिनाऱ्यावर जोशपूर्ण वातावरणात सुरू झाली. १२ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर या दहा दिवसांच्या कालावधीत या स्पर्धेत घाम, जोर, ताकद आणि हुंकार यांचा संगम अनुभवायला मिळणार आहे. अंतिम फेरी अलिबागमध्ये रंगणार असून रायगडभरातून या स्पर्धेकडे लक्ष लागले आहे.







या स्पर्धेच्या उद्घाटनावेळी रायगड पोलिस अधीक्षक आँचल दलाल मॅडम स्वतः उपस्थित राहून खेळाडूंचा आत्मविश्वास वाढवला. पोलिस निरीक्षक श्री. उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही भव्य कबड्डी साखळी उभारण्यात आली.

विशेष म्हणजे, कोळी बांधवांचा उत्स्फूर्त सहभाग आणि उपस्थिती या स्पर्धेला वेगळंच बळ देत आहे. श्रीवर्धन,म्हसळा आणि महाड तालुक्यातील संघ मैदानात उतरले होते. प्रत्येक चढाई, प्रत्येक पकड, प्रत्येक गुणासाठी खेळाडूंनी केलेला प्राणपणाचा संघर्ष किनाऱ्यावर जमलेल्या प्रेक्षकांच्या अंगावर रोमांच उभे करत आहे.

रायगड पोलिस दलाचा हा उपक्रम केवळ खेळापुरता मर्यादित नाही, तर सागरी सुरक्षेबद्दल जागरूकता, एकजूट आणि ताकदीचा संदेश देणारा ठरत आहे. श्रीवर्धनचा किनारा सध्या हुंकारांनी दणाणून गेला आहे – हा खेळ नाही, तर रायगडच्या सागरी बळाचा आविष्कार आहे

# बालसंस्कार शिबिर- २०२५ कार्यक्रमाची उत्साहात सुरुवात

### पालकांसाठी एक महत्त्वाचे माहिती सत्र व लहान मुलांवर विकासाचा भर

## संस्कार हेच खरे शिक्षण- निलेश काळे

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडु संपादक विदर्भ**

**नागपूर**: एडुसन फाउंडेशन तर्फे आयोजित "बालसंस्कार शिबिर - २०२५" चे आयोजन उत्साहात करण्यात आले असून, यामध्ये लहानग्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात येणार आहे. १४ सप्टेंबर रोजी पालकांसाठी एक माहिती सत्र घेण्यात आले, ज्यामध्ये शिबिराचे समन्वयक डॉ. निलेश काळे यांनी शिबिराची सविस्तर माहिती दिली.

डॉ. काळे यांनी सांगितले की, "संस्कार हेच खरे शिक्षण" या संकल्पनेतून शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, शिबिराद्वारे मुलांमध्ये आत्मविश्वास, नैतिक मूल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकास घडवणे हाच मुख्य उद्देश आहे असे स्पष्ट केले. हे शिबिर एकूण ५ सत्रांमध्ये दर रविवारी घेण्यात येणार असून या शिबिराद्वारे मुलांना नैतिक मूल्यांचे शिक्षण,व्यक्तिमत्त्व विकासाचे, खेळ, योग व कथाकथन, कला व हस्तकला, बौद्धिक व सांस्कृतिक उपक्रम याचा लाभ घेता येणार आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मिडीयातील संपर्क मित्र देवराव प्रधान होते. तसेच विशेष अतिथी म्हणून प्रताप काशीकर व दिलीप तांदळे यांची उपस्थिती लाभली. मुख्य अतिथी यांनी बालसंस्कार शिबिराचे महत्व अधोरेखित केले व पालकांना या उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. प्रताप काशीकर यांनी पालक व विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला व बालसंस्कार शिबिराच्या उपयुक्ततेवर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, "आजच्या धकाधकीच्या जीवनात मुलांमध्ये चारित्र्य आणि संस्कार रुजविणे अत्यंत गरजेचे आहे, आणि अशा शिबिरांद्वारेच ते शक्य आहे असे मत व्यक्त करून संस्थेच्या या उपक्रमास शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे संचालन संस्थेच्या सहसंचालिका सरोज काळे यांनी केले. यावेळी नरेश हिवसे व डॉ. हरीश वानखेडे यांनीही आपले मनोगत व्यक्त करत शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या.




## आशिष धोंगडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन ...

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी**
**करण धोंगडे**



कारंजा लाड (वाशिम) सामाजिक कार्यकर्ते आशिष धोंगडे यांच्या वाढदिवसानिमित्त कामरगाव येथे सामाजिक जाणीव जपणारे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले.या कार्यक्रमांतून युवकांमध्ये मूल्यवर्धन आणि समाजसेवेचे भान निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.वाढदिवसाचा प्रारंभ जिल्हा परिषद माध्यमिक मराठी शाळा,कामरगाव येथे विद्यार्थ्यांना 'धर्मनिरपेक्षता' या मूल्यावर आधारित 'लाडू' आणि 'राईस प्लेट' या शॉर्ट फिल्म्सद्वारे मार्गदर्शन करून करण्यात आला. या चित्रफितींमधून सामाजिक ऐक्य,समता आणि मानवतावादी दृष्टिकोन यावर प्रकाश टाकण्यात आला. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी याला सकारात्मक प्रतिसाद दिला.यानंतर ग्रामीण रुग्णालय, कामरगाव येथे दाखल रुग्णांना केळी,सफरचंद,संत्री अशा पौष्टिक फळांचे वाटप करण्यात आले.या उपक्रमामुळे रुग्णांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेले आशिष धोंगडे हे "अनुभव शिक्षा केंद्र" या प्रकल्पाअंतर्गत अमरावती आणि वाशिम जिल्ह्यांचे प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहेत.ते युवकांमध्ये सामाजिक जाणिवा निर्माण करण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवतात.त्यांची कार्यशैली प्रेरणादायी असून, ते नेहमीच युवक,विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी कार्यरत असतात.कार्यक्रमाला दादाराव बहुटे, परशु अण्णा सुरजुसे,जुनेद पठाण,सोनु पठाण,विलास लाड सिद्धार्थ धंदरे व स्थानिक नागरिक,शिक्षक, रुग्णालयातील कर्मचारी आणि हितचिंतक उपस्थित होते. अनेकांनी धोंगडे यांचे अभिनंदन करत त्यांच्या कार्यास शुभेच्छा दिल्या.

साप्ताहिक अनुभव छाया चे संपादक आदरणीय आशिष धोंगडे यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण रुग्णालयात फळ वाटप, शाळेत मूल्याधिष्ठित शॉर्ट फिल्म्सद्वारे युवकांना मार्गदर्शन करण्यात आले आहे.

# प्रगतिशील लेखक संघातर्फे आदिवासी हक्क दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा**

जल, जंगल, जमीन या तीन घटकांचे जतन करणे गरजेचे आहे. देशातील आदिवासी समाज यामध्ये अग्रेसर आहे. म्हणूनच पर्यावरण संवर्धन हेच खरे जागतिक आदिवासी हक्क दिनाचे प्रगतिशील पाऊल असल्याचे मत साहित्यिक देवचंद महाले यांनी व्यक्त केले.

प्रगतशील लेखक संघ, नाशिक यांच्यातर्फे सुरगाणा तालुक्यातील भिवतास या पर्यटनस्थळावर आदिवासी हक्क दिन साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन संविधान जागर मंचचे मधुकर कांबळे यांनी केले. गेल्या ८९ वर्षांपासून प्रगतिशील लेखक संघ तळागाळातील घटकांना एकत्र घेऊन काम करीत आहे. एप्रिल २०२६ रोजी प्रगतिशील लेखक संघाच्या वाटचालीस ९० वर्षे पूर्ण होणार आहेत. तसेच महामानव डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेल्या बहिष्कृत हितकारणी सभेला शंभर वर्ष होत आहेत. कॉम्रेड शरद पाटील यांच्या जन्मशताब्दी चा समारोप, नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दीची सुरुवात, असा सगळा प्रोग्रेसिव्ह वारसा लोकांसमोर यावा या दृष्टीने कार्यक्रम घेतले जाणार आहे. प्रगतिशील लेखक संघ हा पुणे, मुंबई, नाशिक या शहरी पट्ट्यापासून मुक्त करून तो महाराष्ट्राच्या सर्व दूर खेड्या पाड्यात आणि वस्तीपर्यंत पोहचवून प्रोग्रेसिव्ह घटकांपासून पायाभरणी करणे हे ध्येय आहे. पर्यावरण रक्षणाचे धडे प्रत्यक्ष पर्यटनस्थळावर जाऊन देणे, अशी या कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका असल्याचे आयोजकांनी सांगितले.




प्रगतिशील लेखक संघाचे राज्यभर होणाऱ्या तालुका, जिल्हा, शहरे, नगर, वस्ती अशा ठिकाणी होणाऱ्या त्रैवार्षिक अधिवेशनांची सुरुवात सुरगाणा येथील भिवतास येथून जागतिक आदिवासी हक्क दिनानिमित्त करण्यात आली. या औचित्याने समारोपाचा होणारा दोन दिवशीय समारोप समारंभ 11 आणि 12 एप्रिल 2026 रोजी महात्मा फुले जयंती निमित्ताने मुंबईमध्ये दादर येथे होणार आहे. पुढील आठ महिन्यात परिसंवाद, संमेलने, अधिवेशने, प्रगतिशील यात्रा, डिबेट्स, सांस्कृतिक सामाजिक आणि वाड्मयीन चर्चा होणार आहेत. तसेच जानेवारी महिन्यात अहिल्यानगर येथे महाराष्ट्र राज्याचे अधिवेशन पार पडणार आहे. या सगळ्यांची नांदी ठरावी अशी सुरुवात भिवतास येथून करण्यात आली.

यावेळी कादंबरीकार राकेश वानखेडे, कवी प्रमोद अहिरे, कादंबरीकार तुकाराम चौधरी, कथाकार संजय दोबाडे, प्रगतिशीलचे जिल्हा सचिव प्रल्हाद पवार, अंबादास खोटरे, कवी नारायण कुवर, कवी विश्वास वाघमारे, सोमनाथ भुरबुडे, नामदेव पाडवी, साहित्य वाचक बिरारी तसेच इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रामचंद्र पाटील बाळापूरकर यांनी रुग्ण कल्याण समिती सदस्याचा पदभार स्वीकारला

## स्थानिक आरोग्य सेवेत सुधारणा घडवून आणण्याचा निर्धार

दैनिक युवक आधार
धर्माबाद प्रतिनिधी :
गिरमाजी सुर्यकार

बाळापूर शहरातील प्रगल्भ सामाजिक कार्यकर्ते, तीस वर्षे मेडिकलच्या माध्यमातून नागरिकांना सेवा देत असलेले, माननीय आमदार राजेश पवार यांचे अत्यंत विश्वासू रामचंद्र पाटील बाळापूरकर यांनी आज सोमवारी दवाखान्यात रुग्ण कल्याण समिती सदस्य या जबाबदारीचा पदभार स्वीकारला. या प्रसंगी आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी, शहरातील प्रतिष्ठित नागरिक तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मा. आमदार राजेश पवार यांच्या शिफारशीनुसार श्री रामचंद्र पाटील बाळापुर यांची धर्माबाद ग्रामीण रुग्णालयात *रुग्ण कल्याण समिती* वर सदस्य पदी नियुक्ती झाली. त्यांनी आज ग्रामीण रुग्णालयाचे कार्यालयीन अधीक्षक डॉ. वेनुगोपाल पंडित व इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या समवेत संपूर्ण रुग्णालयाची पाहणी केली. त्यामध्ये हिरकणी कक्ष, प्रस्तुतिगृह, शस्त्रक्रिया गृह, सामान्य वार्ड, पिण्याचे पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृह, इतर सर्व बाबींची पाहणी केली तसेच रुग्णांशी संवाद साधला. डॉक्टर पंडित यांनी रुग्णालयात नवीनच सुरू होणारे डायलिसिस विभाग व अत्याधुनिक सामग्री याची माहिती दिली.

यानंतर कार्यालयीन अध्यक्ष डॉक्टर पंडित यांनी सत्कार समारंभाचा कार्यक्रम आयोजन करून श्री रामचंद्र पाटील यांनी पदभार स्वीकारल्याबद्दल रुग्णालयातर्फे सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी डॉक्टर कांबळे सर, डॉ. म्याकलवार सर डॉ. श्याम लखमावार, माजी नगरसेवक श्री रमेश पाटील, श्री नरेंद्र रेड्डी, श्री अंकुश भोसले, श्री (बापू) नरसारेड्डी, श्री दाऊद बेग, श्री संतोष विभुते, पत्रकार संजय कदम पत्रकार भगवान कांबळे आणि रुग्णालयातील इतर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीरामचंद्र पाटील यांच्या नियुक्तीमुळे धर्माबाद तालुक्यातील आरोग्य व्यवस्थेत नवा उत्साह संचारला असून, नागरिकांमध्येही नवी अपेक्षा निर्माण झाली आहे.



**पदभार स्वीकारल्यानंतरचे वक्तव्य**

पदभार स्वीकारल्यानंतर बोलताना पाटील म्हणाले, "रुग्णांना दर्जेदार व वेळेवर उपचार मिळणे, औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवणे, दवाखान्यात स्वच्छता व सुव्यवस्था राखणे तसेच जनतेसाठी आरोग्य सुविधा सक्षम करणे हेच माझ्या केंद्रबिंदू असेल. या समितीतून मिळणाऱ्या जबाबदारीचे मी प्रामाणिकपणे पालन करणार आहे."